www.yuvakadhar.in
E mail - dainikyuvakaadhar@gmail.com
facebook : yuvakadhar

दैनिक
तरुणांचा बुलंद आवाज
# युवक आधार
मराठी

दै. युवक आधार करीता
प्रतिनिधी नेमने आहे.
मुंबई, ठाणे नाशिक, रायगड , आलिबाग
खोपोली ,पुणे , सांगली , सातारा ,कोल्हापुर,
अहमदनगर, औरंगाबाद, बीड, नांदेड, शहर
प्रतिनिधी नेमने आहे.
9220403509 संपर्क 9594509661
श्री.संतोष शिवदास आमले | श्री. सुरेश आत्माराम भोईर

मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले उपसंपादक - श्री.विलास मनोहर गायकवाड कार्यकारी संपादक - श्री.सुरेश आत्माराम भोईर निवासी संपादक - श्री. राकेश जनार्दन पाटील सह संपादक : मुकुंद कांबळे

वर्ष : २ अंक : १४३ वा शुक्रवार दि. ०७ फेब्रुवारी २०२५ किंमत : ४ रु पृष्ठ : ४ RNI MAHMAR/2023/89514

## पेण-रावे गावात माघी गणेशोत्सवाच्या निमित्ताने बहरले कवी संमेलन

**दैनिक युवक आधार**


**महाराष्ट्र प्रतिनिधी**–पेण तालुक्यातील रावे गावात माघी गणेशोत्सवाच्या निमित्ताने ज्येष्ठ कवी अरुण धर्माजी पाटील यांच्या नेतृत्वाखाली मंगळवारी (दि.४) फेब्रुवारी रोजी कवी संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. निवृत्त सहाय्यक अधीक्षक विजय कृष्णा पाटील हे या कवी संमेलनाचे अध्यक्ष स्थानी होते.कवी संमेलनाचा शुभारंभ कवी अरुण द. म्हात्रे यांच्या ईशस्तवनाने करण्यात आला. उरण, जासई, चिर्ले, डोलवी,



पांडवादेवी, जोहे, कळवा, हमरापुर, तांबडशेत, कर्जत, दूरशेत, बळवली या गावातून, कवी संमेलनासाठी आलेल्या कवींनी स्वरचित कवितांमधून उत्तम रचना सादर केल्या. दरम्यान या संमेलनात कवी भ. पो. म्हात्रे हरिश्चंद्र माळी, अरुण म्हात्रे, एस्. एस्. पाटील, रवींद्र मोकल, अजय भोईर, प्रसाद फके, रामचंद्र म्हात्रे, मोहन पाटील, मारुती बागडे, रमेश पाटील, नरेश म्हात्रे या कवींनी सहभाग घेतला होता.कवी समेलनाचे सूत्रसंचालन आर. डी. पाटील यांनी केले, कवी समेलनाचे आयोजन सिद्धिविनायक मित्र मंडळ रावे पेण यांच्या वतीने, कवी अरुण धर्माजी पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले हे कवी समेलन यशस्वी करण्या साठी होते. सिद्धिविनायक मित्र मंडळाचे अध्यक्ष, पदाधिकारी व सदस्यांनी विशेष मेहनत घेतली. यावेळी उपस्थित कवींचे गुलाब पुष्प देऊन स्वागत करण्यात केले. मंडळाच्या सदस्यांबरोबर ग्रामस्थांनीही मोठ्या संख्येने हजेरी लावून, कार्यक्रमाला शोभा वाढविली होती.

# "रिझर्वेशन देऊनही काही जण डबे बदलतात"

## गोरखपूरसाठी कोकण रेल्वेच्या मार्गात बदलल करण्यावरुन ठाकरेंचा इशारा



हल्ली रिझर्वेशन देऊन सुद्धा अनेक जण डबे बदलतात. ज्यांना उद्दिष्ट नाही त्यांच्या गाड्या भरकटतात असा टोला उद्धव ठाकरे यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना लगावला आहे. यावेळी त्यांनी केंद्र सरकारवरही निशाणा साधला. दिल्लीमध्ये बसलेले फक्त दिल्लीपुरतं बघतात. गोरखपूरला रेल्वे न्यायची तर न्या, पण आमची कोकण रेल्वे वळवू नका असा इशारा सुद्धा उद्धव ठाकरे यांनी केंद्र सरकारला दिला. दोन दिवसांपूर्वी सादर झालेल्या मुंबई महापालिकेच्या अर्थसंकल्पावरही उद्धव ठाकरेंनी भाष्य केले.

रेल कामगार सेनेच्या २४ व्या वार्षिक अधिवेशनाला उद्धव ठाकरे यांनी हजेरी लावली होती. त्यावेळी ते बोलत होते. मागे दोनदा मी तुमच्या कार्यक्रमासाठी आलो होतो मी पुन्हा येईन असं म्हणणार नाही पण नेहमी येत राहील, असे उद्धव ठाकरे म्हणाले. मुंबई महानगरपालिका आता श्रीमंत पालिका राहिलेली नाही. मुंबई पालिकेने इतकी देणी करून ठेवली आहेत की पुढच्या २३ वर्षांमध्ये ही ती चुकवता येणार नाहीत, असेही उद्धव ठाकरे यांनी म्हटलं.

"कट्टर शिवसैनिकांनी कधी काय दिलं नाही दिलं याची पर्वा केलेली नाही. कारण आताचा जमाना असा आहे की पक्षात येण्याआधी रिझर्वेशन हवं असतं. रिझर्वेशन असेल तर मी पक्षात येतो आणि जरा कुठे काही खुट्ट झालं की रिझर्वेशन दिलेलं असलं तरी लोक डबे बदलतात, गाड्या बदलतात," असा टोला उद्धव ठाकरे यांनी लगावला.

"पूर्वी रेल्वे खात्याचा एक अर्थसंकल्प येत होता पण हे सरकार आल्यापासून एक एक संस्था मारून टाकण्याचे काम सुरू आहे रेल्वेचा अर्थसंकल्प मुख्य अर्थसंकल्पात एकत्र केला. दिल्लीमध्ये बसलेले फक्त दिल्लीपुरतं बघतात. आता त्यांनी आपली ट्रे गोरखपूरला रेल्वे न्यायची असा निर्णय घेतला आहे. पण आमची हक्काची कोकण रेल्वे वळवून नेणार असाल तर आम्ही पेटून उठायचं नाही तर काय करायचं. सुरतला जाणारी ट्रेन बंद केली पाहिजे कारण त्याचा वाईट अनुभव आम्हाला आला आहे. रेल्वे अर्थसंकल्पात महाराष्ट्राच्या वाट्याला भरपूर आल्याचे म्हणतात. पण ते जनतेच्या वाटेला पोहोचतं की ना हा प्रश्न महत्त्वाचा आहे," असं उद्धव ठाकरे म्हणाले.

"मुंबई महापालिका ही कदाचित जगातील सर्वात श्रीमंत महानगरपालिका होती. ती सुद्धा यांनी आता भीकेला लावली आहे. वाईट एवढ्या गोष्टीचं वाटतं की कष्ट करून तोट्यात असलेली मुंबई महानगरपालिकेच्या मुदत ठेवी वाढवत नेल्या. ९२ हजार कोटींपर्यंतच्या मुंबई महापालिकेच्या ठेवी होत्या. आता त्या ८० हजार कोटींपर्यंत आल्या आहेत. यासह अडीच लाख कोटींची देणी यांनी करून ठेवली आहेत. आता एवढं देणं यांनी मुंबई महापालिकेच्या डोक्यावर करुन ठेवलं आहे पुढची २३ वर्षे ही देणी आपण देत राहू," असेही उद्धव ठाकरे म्हणाले.

# लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्यात हिंमत आहे म्हणूनच त्यांनी करून दाखवले - काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष महेंद्र घरत



**दैनिक युवक आधार**

**पनवेल (प्रतिनिधी)**–सामाजिक बांधिलकीतून लोकनेते रामशेठ ठाकूर सतत काम करत असतात. त्यामुळे त्यांना सर्व समाजात मानणारा मोठा वर्ग आहे. ते या भूमीत जन्मले आणि त्यांनी येथील प्रत्येक माणसाचा विचार करत या भूमीचा उद्धार केला त्यामुळे त्यांचा आम्हा सर्वांना अभिमान आहे. लोकनेते रामशेठ ठाकूर स्थानिकांच्या हक्कासाठी लढणारे नेते आहेत, त्यामुळे उलवा नोड मध्ये उभारण्यात येणाऱ्या शिवसृष्टीच्या अनुषंगाने येथील मैदान लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या नावाने ओळखले जाणार असून येथील शिवसृष्टी आणि मैदान विभागाच्या नावलौकिकात भर टाकणारे ठरणार आहे, असे प्रतिपादन छत्रपती शिवाजी महाराज अश्वारूढ पुतळा उभारणी व सुशोभीकरण समितीचे सरचिटणीस, काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष व कामगारनेते महेंद्र घरत यांनी आज (दि. ०६) शेलघर येथे केले.मुंबईतील शिवाजी पार्कच्या धर्तीवर उलवे नोडमध्ये महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराजांचा अश्वारूढ पुतळा, मैदानाचा विकास आणि त्या अनुषंगाने शिवसृष्टीच्या उभारणी कामाला लवकरच सुरुवात होणार असून १९ फेब्रुवारीला शिवजयंती निमित्त आयोजित करण्यात येणाऱ्या कार्यक्रमांसंदर्भात छत्रपती शिवाजी महाराज अश्वारूढ पुतळा उभारणी व सुशोभीकरण समितीची नियोजन आढावा बैठक समितीचे अध्यक्ष माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. त्यावेळी ते बोलत होते.या बैठकीस समितीचे उपाध्यक्ष अरुणशेठ भगत, ज्येष्ठ नेते वाय. टी. देशमुख, भाऊशेठ पाटील, वसंत म्हात्रे, वसंत पाटील, माजी पंचायत समिती सदस्या रत्नप्रभा घरत, विश्वनाथ कोळी, अमर म्हात्रे, माजी सरपंच हरेश्वर म्हात्रे, सागर ठाकूर, सचिन घरत, हेमंत ठाकूर, अमृत भगत, व्ही. के.ठाकूर, किसन पाटील,

> **शिवाजी पार्कचा जसा उल्लेख होतो त्याचप्रमाणे येथील शिवसृष्टीचा आणि मैदानाचा नाव झाला पाहिजे. त्यासाठी या ठिकाणी सर्व सुविधा देण्याचे काम करण्यात येणार आहे. येथील वास्तू व्यक्तिगत माझी नसून समाजाची मालमत्ता आहे. आणि याचा ताबा अधिकार गव्हाण ग्रामपंचायतीकडे राहणार आहे. शिवजयंतीला या ठिकाणी विविध कार्यक्रम आयोजित करून शिवजयंती मोठ्या उत्साहात साजरी होणार आहे.**
> **- माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर**

गजानन घरत, सचिन पाटील, सी.एल. ठाकूर, भार्गव ठाकूर, अनंत ठाकूर, अशोक कडू, उषा देशमुख, कामिनी कोळी, सुजाता पाटील, योगिता भगत, मिनाक्षी पाटील, सुधीर ठाकूर, दर्शन ठाकूर, सुजित ठाकूर, रघूनाथ देशमुख, अनुप भगत, प्रमोद कोळी, गोपी भोईर, महादेव कोळी, भाऊ भोईर, भगवान कोळी, वामन ठाकूर, बाळकृष्ण कोळी, राजकिरण कोळी, विनायक कोळी, वैभव घरत, कमलाकर देशमुख, रोशन म्हात्रे, प्रमोद कोळी, संकल्प घरत, काशिनाथ पाटील, किशोर पाटील, मनोज कोळी, यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते.महेंद्र घरत यांनी पुढे बोलताना सांगितले की, छत्रपती शिवाजी महाराजांचा अश्वारूढ आणि प्रेरणादायी पुतळा उभारण्यासाठी लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली अनेक वर्षांपासून पाठपुरावा सुरु होता. त्याच अनुषंगाने या ठिकाणी असलेल्या मैदानाला लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे नाव देण्याचा ठराव ग्रामपंचायतीच्या ग्रामसभेत घेऊन तो पारीतही केला. आता या मैदानाचे नामकरण शिवजयंतीच्या पवित्र दिवशी होणार आहे. घरत यांनी पुढे म्हंटले की, लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे प्रत्येक समाजात कार्य आहे. या विभागाचे ते आधारस्तंभ आहेत. त्यांनी गरजेपोटी घरे नियमित करणे, १९८४ चा आंदोलन, साडेबारा टक्के लढा, जेएनपीटी लढा असो व येथील भूमिपुत्रांचे प्रश्न असो ते मार्गी लावत तसेच सढळ हस्ते मदत करत समाजाला मोठा आधार दिला आहे. लोकनेते रामशेठ मोठ्या उंचीचे व्यक्तिमत्व आहेत त्यामुळे राजकीय चपला बाजूला सारून ते समाजासाठी काम करत असतात. या भागाचा विकास झाला आहे तो त्यांच्या दूरदृष्टीतून आणि प्रयत्नातूनच कारण लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्यात हिंमत आहे म्हणूनच त्यांनी ते करून दाखवलं आहे, असेही घरत यांनी म्हंटले. १९ फेब्रुवारीला शिवजयंतीचा कार्यक्रम मोठा झाला पाहिजे यासाठी तयारी सुरु असून या कार्यक्रमाचे महत्व जाणून घेत परदेशात होणाऱ्या कामगारांच्या बैठकीला जाणार नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

# 1 सप्टेंबर 2024 रोजी झालेल्या अतिवृष्टीचे अनुदान मंजूर - माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांची माहिती

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी. नामदेव मंडपे-मंठा जालना**–1 सप्टेंबर 2024 रोजी परतूर विधानसभा मतदारसंघातील अनेक गावांमध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे पिकाचे प्रचंड मोठे नुकसान झाले असून अनेक गावांमध्ये अतिवृष्टी नसली तरी सततच्या पावसामुळे खूप मोठे नुकसान झाले आहे त्या नुकसानीची भरपाई तात्काळ देण्यात यावी अशी मागणी वारंवार माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांनी लावून धरली होती, त्या मागणीला आता यश आले असून सदरील अतिवृष्टीचे अनुदान मंजूर करण्यात आले आहे त्या अनुदानाची रक्कम तहसीलदार मंठा व परतुर यांच्याकडे जमा झाली असल्याची माहिती माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांनी दिली.परतुर तालुक्यामध्ये 57 गावात एक सप्टेंबर 2024 रोजी प्रचंड अतिवृष्टी झाल्यामुळे पिकांचे मोठे नुकसान झाले होते त्यामध्ये 25 हजार 454 बाधित शेतकऱ्यांचा समावेश असून या शेतकऱ्यांना नुकसान भरपाई च्या स्वरूपात 32 कोटी 61 लाख रुपये मंजूर करण्यात आले आहेत. तर मंठा तालुक्यातील 85 गावांमध्ये अतिवृष्टी झाली होती त्यामध्ये 45571 शेतकरी बाधित झाले असून त्यांच्या नुकसानीची भरपाई म्हणून शासनाच्या वतीने 55 कोटी 88 लाख रुपये मंजूर करण्यात आले आहेत असे मंठा व परतुर दोन्ही तालुके मिळून 71025 शेतकऱ्यांना 88 कोटी 49 लाख रुपये रक्कम प्राप्त झाली असल्याचे आमदार बबनराव लोणीकर यांनी यावेळी स्पष्ट केले.परतुर व मंठा तालुक्यातील मंठा, परतूर, श्रीष्टी व वाटुर अशी चार मंडळे 65 मिली

> **तहसीलदार, गटविकास अधिकारी व तालुका कृषी अधिकारी यांनी तात्काळ अनुदानाच्या याद्या अपलोड कराव्यात**
> **- आमदार बबनराव लोणीकर यांच्या सूचना**

> **परतुर तालुक्यासाठी 32 कोटी 61 लाख रुपये तर मंठा तालुक्यासाठी 55 कोटी 88 लाख रुपये अशी एकूण 88 कोटी 49 लाख रुपये एवढी अनुदानाची रक्कम प्राप्त**
> **- आमदार बबनराव लोणीकर**

> **अतिवृष्टी नसली तरी सततच्या पावसामुळे अतिवृष्टी इतकेच नुकसान झाले आहे अशा शेतकऱ्यांना देखील तात्काळ आणि सरसकट मदत करा**
> **- आमदार बबनराव लोणीकर यांची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे मागणी**

पेक्षा कमी पाऊस पडल्यामुळे वगळण्यात आली होती. परंतु या सर्व मंडळांमध्ये सततच्या पावसामुळे प्रचंड मोठे नुकसान झाले होते. ही बाब माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांनी शासन व प्रशासनाच्या निदर्शनास आणून दिली होती. या स्वतःच्या पावसामुळे देखील अनेक शेतकऱ्यांची अतोनात नुकसान झाले असल्याचे आमदार बबनराव लोणीकर यांनी तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व कृषी मंत्री धनंजय मुंडे यांच्या निदर्शनास प्रत्यक्ष भेट घेऊन व पत्रव्यवहार करून आणून दिले होते. सततच्या पावसामुळे ज्या शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे त शेतकऱ्यांना देखील सरसकट मदत करण्यात यावी अशी मागणी आमदार बबनराव लोणीकर यांनी यापूर्वी देखील केली होती आणि आता देखील आपण या मागणीचा सातत्याने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे पाठपुरावा करणार असल्याचे आमदार लोणीकरांनी स्पष्ट केले.अतिवृष्टीमुळे बाधित शेतकऱ्यांना अनुदानाची रक्कम मंजूर झाल्यानंतर बाधित शेतकऱ्यांची यादी तलाठी ग्रामसेवक व कृषी सहाय्यकाच्या माध्यमातून अपलोड करणे अपेक्षित आहे. परंतु अद्याप पर्यंत अनेक गावांमधून या याद्या अपलोड करण्यात आलेला नाहीत याची गंभीर दखल घेत आमदार बबनराव लोणीकर यांनी आज परतुर व मंठा या दोन्ही तालुक्याचे तहसीलदार, गटविकास अधिकारी व तालुका कृषी अधिकारी यांना कठोर शब्दात सूचना करत शेतकऱ्यांच्या अनुदानाची रक्कम तात्काळ त्यांच्या खातात जमा करण्यासंदर्भात कुठल्याही प्रकारची निष्काळजी पणा करू नये अन्यथा लोकप्रतिनिधी म्हणून आम्हाला कठोर भूमिका घ्यावी लागेल अशा शब्दात सुनावले महसूल पंचायत व कृषी प्रशासनाच्या वतीने याची गंभीर दखल घेतली आणि तात्काळ सर्व बाधित शेतकऱ्यांच्या याद्या अपलोड केल्या तर आठवडाभरात शेतकऱ्यांच्या खात्यात रक्कम जमा होऊ शकते असेही आमदार बबनराव लोणीकर यांनी स्पष्ट केले आहे.





# व्हिस्टा प्रोसेस फूड्सच्या सी एस आर अनुदान

## फंडाद्वारे रोटरी क्लब ऑफ पनवेल सेंट्रलच्या माध्यमातून उपजिल्हा रुग्णालयाला दहा लाख रुपये किमतीच्या औषधांचा 'डोस' सुपूर्द !

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल वार्ताहर**-पनवेल येथील डॉ. नानासाहेब धर्माधिकारी उप जिल्हा रुग्णालयात औषधांचा तूटवडा भासत असताना रोटरी क्लब ऑफ पनवेल सेंट्रल मार्फत विस्टा प्रोसेसेड फूड्स च्या सी एस आर अनुदान फंडा द्वारे डॉ. नानासाहेब धर्माधिकारी उप जिल्हा हॉस्पिटल मध्ये तब्बल दहा लाख रुपये किमतीची औषधे व वैदयकीय उपकरणे तातडीने हस्तांतरित करण्यात आली. त्याचा फायदा अनेक गोर गरीब गरजू रूग्णांना होऊ शकेल. डॉ. नानासाहेब धर्माधिकारी उप जिल्हा हॉस्पिटलचे प्रमुख डॉ. गीते यांनी सर्वांचे स्वागत करून प्रस्तावना करताना या हॉस्पिटलचा फायदा पनवेल शहर तसेच तालुक्यातील लाखो रुग्ण घेत असल्याचे सांगितले. शिवसेनेचे महानगरप्रमुख ॲड. प्रथमेश सोमण यांनी मार्गदर्शन करताना चंद्रशेखर सोमण व शिवसेना यांनी अनेक





वर्षे या हॉस्पिटलसाठी कसे प्रयत्न केले व या हॉस्पिटलद्वारे अनेक रुग्णांना वैद्यकीय मदत उपलब्ध करून फायदा करून दिला याची माहिती करून दिली. विस्टा प्रोसेस फुड कंपनीच्या माध्यमातून यापूर्वीही 2019 व 2023 रोजी तब्बल 20 लाख रुपयांची औषधं व उपकरण उपजिल्हा रुग्णालयास तर मागील पाच वर्षात 25 लाख रुपयांची मदत दयालिसिस रुग्णांसाठी पटवर्धन रुग्णालयाला ही देण्यात आली होती. त्याच बरोबर रोटरी क्लब ऑफ पनवेल सेंट्रल चा डॉ. गिरीश गुणेंच्या मार्गदर्शनाखाली करण्यात येणाऱ्या प्रामाणिक समाजसेवेचे कौतुक केले. रोटरी प्रांतचे माजी प्रांतपाल डॉ. गिरीश गुणे यांनी मार्गदर्शन करताना रोटरीच्या माध्यमातून या उप जिल्हा हॉस्पिटलला विविध वैद्यकीय उपकरणे वेळोवेळी रोटरी क्लबच्या मार्फत उपलब्ध करून दिली असल्याचे सर्व उपस्थितांच्या निदर्शनास आणले. पनवेल शहर पोलिस स्टेशनचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक ठाकरे यांनी रोटरी क्लब, उप जिल्हा रुग्णालय व विस्टा प्रोसेसेड फूड्स व सोमण कुटुंबीय यांच्या समर्पित रुग्णसेवेचे व कार्याचे कौतुक करून त्यांचे वेळोवेळी सहकार्य पोलिसांना देखील मिळत असल्याचे सांगितले. या कार्यक्रमासाठी विस्टा प्रोसेसेड फूड्सचे व्यवस्थापकीय संचालक भुपिंदर सिंग, ज्यांच्या माध्यमातून ही मदत रुग्णालयास करण्यात आली ते कंपनीचे व्यवस्थापकीय सल्लागार तथा शिवसेना स्थानिक नेते चंद्रशेखर सोमण, रोटरीचे माजी प्रांतपाल डॉ. गिरीश गुणे, पनवेल शहर पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक नितीन ठाकरे, शिवसेनेचे ॲड. प्रथमेश सोमण, उप महानगर प्रमुख महेश सावंत, पोलिस निरीक्षक अभंग, रोटरी क्लब ऑफ पनवेल सेंट्रलचे अध्यक्ष शैलेश पोटे, सचिव दीपक गडगे, खजिनदार ऋषिकेश बुवा, प्रसाद सोनावणे, माजी अध्यक्ष डॉ. आमोद दिवेकर, डॉ. सह सर्व रोटरी सदस्य, अँनस् व हॉस्पिटल चे सहकारी डॉक्टर्स, नर्सेस, फार्मासिस्ट, जेष्ठ नागरिक उपस्थित होते.

## चिरनेर ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी अरुण पाटील यांची बिनविरोध निवड

**दैनिक युवक आधार**

**महाराष्ट्र प्रतिनिधी**-उरण तालुक्यातील चिरनेर ग्रामपंचायतीचे विद्यमान सदस्य अरुण हिराजी पाटील यांची चिरनेर ग्रामपंचायतीच्या उपसरपंच पदी बिनविरोध निवड करण्यात आली आहे. उपसरपंच सचिन घबाडी यांनी रजिनामा दिल्याने रिक्त झालेल्या उपसरपंच पदी चिरनेर ग्रामपंचायतीचे सरपंच भास्कर मोकल यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आलेल्या निवडणुकीत रिक्त झालेल्या उपसरपंच पदाच्या जागेसाठी चिरनेर ग्रामपंचायतीचे प्रभाग क्रं मधिल सदस्य अरुण पाटील यांचा एकमेव उमेदवारी अर्ज आल्याने त्यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे. हिराजी पाटील यांची उपसरपंच पदी बिनविरोध निवड झाल्याने चिरनेर ग्रामस्थांमध्ये आनंदाचे वातावरण असून सर्व स्थरांतून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. चिरनेर ग्रामपंचायत हद्दीत सरपंच भास्कर मोकल यांच्या खांद्याला खांदा लावून तसेच ग्रामपंचायतीचे सर्व सदस्यांना सोबत घेऊन विकासाची कामे पूर्णतःवास नेण्याचा आमचा मानस आहे. तर सध्या चिरनेर ग्रामपंचायत हद्दीत घरांच्या बांधकामात वाढलेल्या अतिक्रमणाला आळा घालण्यासाठी आम्ही कटीबद्ध राहून, गावातील ग्रामस्थांच्या रहदारीचे मार्ग सुरळीत करण्यासाठी अधिक लक्ष घालणार असल्याची ग्वाही नवनिर्वाचित उपसरपंच अरुण पाटील यांनीयावेळी आमच्याप्रतिनिधी बरोबर बोलतना दिली. चिरनेर ग्रामपंचायतीचे सरपंच यांनी नवनिर्वाचित उपसरपंच अरुण पाटील यांना उपसरपंच पदाची सूत्रे हाती दिली.यावेळी त्यांना शुभेच्छा देण्यासाठी पनवेल महानगर पालिकेचे माजी विरोधी पक्षनेते,उरण विधानसभा मतदार संघातील लढवू उमेदवार प्रितम म्हात्रे यांच्यासह उरण पंचायत समितीचे माजी सभापती नरेश घरत, शेकापचे जासई विभाग चिटणीस सुरेश पाटील, माजी उपसभापती शुभांगी पाटील चिरनेर गाव तंटामुक्तीचे अध्यक्ष अलंकार परदेशी,ग्रामविकास अधिकारी महेश पवार,रमाकांत पाटील,ग्रामपंचायत सदस्य पद्माकर फोफेरकर, दिपक कातकरी,समिर डुंगीकर,सदस्या वनिता गोंधळी,समुद्रा म्हात्रे,जयश्री चिर्लेकर,निकिता नारंगीकर,भारती ठाकूर,मृणाली ठाकूर निलम चौलकर यांच्यासह माजी मुख्याध्यापक दिलीप पाटील,बाळू मोकल,पराग ठाकूर,नितीन म्हात्रे यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.




## शिरसोली येथे गणेश मूर्ती प्राणप्रतिष्ठा सोहळा मोठ्या उत्साहाने साजरी

**दैनिक युवक आधार**

**जळगाव प्रतिनिधी/समाधान पाटील**-जळगाव तालुक्यातील शिरसोली येथे दिनांक 5/02/2025 रोजी शिरसोली येथे गणेश मुर्ती ची प्राणप्रतिष्ठा सोहळा व मिरवणूक चैतन्यमय वातावरणात काढण्यात आली यावेळी शेकडो नागरिक उपस्थिती होते ही मिरवणूक शिरसोली प्र बो येथुन सुरुवात झाली पुढे बस स्टॉप शिवराय चौक चार नळ चौक शंभूराजे चौक व दत्त मंदिर भागात बँड व ढोलताशांच्या वाजत गाजत गजरात मिरवणूक काढण्यात आली यावेळी मंदिराचे कार्यकर्ते हरी पाटील पिंटू भोई नामदेव महाजन भैय्या काळे संतोष मराठे दिलीप महाजन राजू नाव्ही व ग्रामस्थांनी मोठ्या प्रमाणावर सहकार्य केले पुढील तीन दिवस मूर्तीची पूजा करून प्रतिष्ठा करण्यात येणार आहे गुरुवार तारीख सात रोजी महाप्रसादाचे आयोजन केले आहे तरी सर्वांनी महाप्रसादाचा लाभ घ्यावा अशी विनंती करण्यात आली




## कर्ज फेडीसाठी दिलेला चेक न वटल्यामुळे कर्जदारास 2 लाख 60 हजारचा दंड

**युवक आधार निफाड**

**प्रतिनिधी राहुल कुलकर्णी**:फाड येथील स्वर्गीय शांतीलाल सोनी निफाड नागरी पतसंस्थेकडून घेतलेल्या कर्जाच्या परतफेडीसाठी दिलेला धनादेश न वाटल्यामुळे संबंधीत कर्जदारास न्यायालयाने 2 लाख 60 हजार रुपयांचा दंड आणि एक महिना कारावास तसेच दंड न भरल्यास सहा महिने कारावासाची शिक्षा सुनावली. या निकालामुळे बँकांकडून घेतलेल्या कर्जाची वेळेवर परतफेड न करणाऱ्या कर्ज बुडव्यांना चांगलाच धडा मिळाल्याची चर्चा बँकिंग क्षेत्रात सुरू आहे.या प्रकरणी पतसंस्थेच्या सूत्रांकडून प्राप्त माहितीनुसार, कोठुरे तालुका निफाड येथील रहिवासी कर्जदार बाजीराव सूर्यभान वलटे यांनी स्वर्गीय शांतीलाल सोनी निफाड नागरी पतसंस्थेच्या कडून दिनांक 10 नोव्हेंबर 2015 रोजी दोन लाख रुपयांचे कर्ज उचललेले होते. सदर कर्जाची फेड करण्यासाठी म्हणून आरोपीने संस्थेला दिनांक 23 ऑक्टोबर 2019 रोजी 2 लाख 60 हजार रुपये रकमेचा धनादेश दिलेला होता. परंतु आरोपीने कर्जफेडीसाठी दिलेला धनादेश वटू शकला नाही. त्यामुळे संस्थेच्या वतीने कर्ज वसुली अधिकारी चंद्रकांत वैद्य यांनी आरोपी विरुद्ध निफाड येथील न्यायालयात रीतसर खटला दाखल केला. अतिरिक्त मुख्य न्याय दंडाधिकारी श्री. नरेंद्र जोशी यांच्या न्यायालयात सदर खटल्याचे कामकाज चालले. संस्थेच्या वतीने कायदेशीर सल्लागार म्हणून एडवोकेट शिवाजी भोई यांनी संस्थेची बाजू मांडली. न्यायालयाने समोर आलेल्या सर्व कागदपत्र व पुराव्यांचा विचार करून आरोपी विरुद्ध असलेले आरोप सिद्ध होत असल्याने त्यास 2 लाख 60 हजार रुपये इतका दंड आणि एक महिना कारावासाची तसेच दंड न भरल्यास सहा महिन्यांचा कारावास अशी शिक्षा सुनावली.

## भगवंत आणि माणसाला जोडणारा सोपा मार्ग म्हणजे नामस्मरण, ज्ञानेश्वर माऊली ज्ञानियांचा राजा :- नंदिनीताई महाराज

**दैनिक युवक आधार**

**पाटोदा (प्रतिनिधी)** -संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊली हे सर्वज्ञानी होते वयाच्या अवघ्या २२ व्या वर्षी त्यांनी संजीवन समाधी घेतली. तरी ही त्यांच्या समाधीवर सर्वजण नतमस्तक होतात त्या मुळे ज्ञानेश्वर माऊली हे खऱ्या अर्थाने ज्ञानियांचे राजा आहेत असे प्रतिपादन नंदिनीताई महाराज मैंद यांनी केले. पाटोदा तालुक्यातील श्रीक्षेत्र संत मिराबाई आईसाहेब संस्थान, महासांगवी येथे संत मिराबाई आईसाहेब यांच्या २७ व्या पुण्यतिथी निमित्त अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले असून या सप्ताहामध्ये किर्तन सेवा प्रसंगी नंदिनीताई महाराजांनी भक्ती मार्गाचे दाखले देत भाविकांना मंत्रमुग्ध केले. नंदिनीताई महाराज म्हणाले की संत ज्ञानेश्वर महाराज हे सर्वज्ञाने होते संत एकनाथ महाराज यांच्या कडे शांतीचा मोठा गुण होता त्या मुळे त्यांना शांती ब्रह्म म्हटले जाते. संत तुकोबाराय संत निळोबाराय या सारख्या थोर संतांनी समाजाला योग्य दिशा दिली जीवनात नामस्मरणाला खूप महत्त्व आहे. भगवंत आणि माणसाला जोडणारा सोपा मार्ग म्हणजे नामस्मरण होय. या वेळी संस्थानच्या मठाधिपती महंत राधाताई महाराज यांनी सप्ताहातील सर्व कार्यक्रमाची माहिती दिली. त्यानी सांगितले की या संस्थानातून संस्कारी व गुणी मुली घडविल्या जातात या किर्तन सेवेला माताजी कुसुमाताई सानप, विठ्ठल महाराज सांगळे, सामाजिक कार्यकर्ते स्वामी सानप, शिवाजीराव गर्जे, प्रभाकर मैंद, गोपाळ सोळसकर, ज्ञानेश्वर गुट्टे यांच्या सह भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## महसूल मंत्री मा चंद्रशेखर बावनकुळे साहेब यांचा धडाकेबाज निर्णय.

### (लासलगावच्या सर्वे नंबर ९३ च्या १७३ कुटुंबांना दिलासा..)

**दै. युवक आधार**

**विंचूर प्रतिनिधी/जनार्दन चव्हाण/लासलगाव (नाशिक)** : लासलगाव येथील ९३ नंबर सबंधित भोगवटदार वर्ग २ च्या जमिनी भोगवटदार वर्ग १ मध्ये रूपांतरित करण्यासाठी मुदतवाढ दिल्याने वर्षोन वर्ष प्रलंबित असलेला लासलगाव येथील प्रश्न सुटण्यास मदत होणार आहे. राज्याचे माजी उपमुख्यमंत्री छगन रावजी भुजबळ आणि भाजपा महामंत्री सुवर्णा जगताप यांच्या पाठपुराव्या नंतर लासलगाव शिष्ठ मंडळास शैलेश ठाकरे, मयूर झांबरे व सत्ता समितीचे सदस्य यांनी बावणकुळे साहेबांची भेट घेऊन चर्चा केली. लगेचच महाराष्ट्रात बाकीच्या केसेसची पण दखल घेऊन, कालच्या मंत्री मंडळाच्या सभेत प्रश्न मांडून जीआर काढला. तळागाळातील लोकांचे प्रश्न समजून घेऊन प्रश्न मार्गी लावण्यास सरकार किती तत्पर आहे हेच कालच्या महसूलमंत्री मा बावणकुळे साहेबांच्या निर्णयाने दिसून आले. त्यासाठी महसूलमंत्री मा. चंद्रशेखर बावणकुळे यांचे मनपूर्वक धन्यवाद व्यक्त केले.शेती, अकृषिक, निवासी, वाणिज्यिक अथवा औद्योगिक प्रयोजनासाठी तसंच सहकारी गृहनिर्माण संस्थांना भाडेपट्ट्यानं किंवा कब्जेहक्कानं दिलेल्या शासकीय भोगवटादार वर्ग-२ च्या जमिनी भोगवटादार वर्ग-१ मध्ये रुपांतरित करताना कमी अधिमूल्य आकारण्याच्या अभय योजनेस एक वर्षांची मुदत वाढ. महसूल मंत्री बावनकुळे साहेबांची काल कॅबिनेट पूर्वी भेट घेतली. साहेबांनी हा विषय मार्गी लावला. शर्तभंग प्रकरने नियमित करण्यासाठी लवकरच मंत्रालयात विशेष बैठकीचे आयोजन करण्यात येणार आहे.



# वाहन चोरी व मोबाईल चोरी करणाऱ्या सराईत गुन्हेगारांना पनवेल तालुका पोलिसांनी केले गजाआड

**दैनिक युवक आधार**

**पनवेल, वार्ताहर**-पनवेल परिसरात तसेच इतर ठिकाणी वाहन चोरीसह मोबाईल चोरी करणाऱ्या सराईत दोन गुन्हेगारांना जेरबंद करण्यात पनवेल तालुका पोलिसांना यश आले असून यांच्या अटकेमुळे मोठ्या प्रमाणात गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे. तसेच त्यांच्याकडून आतापर्यंत जवळपास 4 लाख रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.पनवेल तालुका पोलीस ठाणे कार्यक्षेत्रात यज्ञ अपार्टमेंट, ओम ट्रेडर्स दुकानासमोर, डेरवली गाव येथे उभी करून ठेवलेली महिद्रां कंपनीचे पिकअप क्रं एम.एच 46 ई 3950 ही कोणीतरी अज्ञात चोरटयाने फिर्यादीच्या संमतीशिवाय लबाडीच्या इरादयाने चोरी करून नेली म्हणुन पिकअप मालकानी दिलेल्या तक्रीवरून पनवेल तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. सदर दाखल गुन्हयाचा तपास तसेच चोरीचे गुन्हे उघडकीस आणण्याचे दृष्टीने सहा. पोलीस आयुक्त, पनवेल विभाग, अशोक राजपुत यांचे मार्गदर्शनाखाली पनवेल तालुका पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक, गजानन घाडगे यांचे नेतृत्वाखाली पनवेल तालुका पोलीस ठाण्याचे पोलीस अधिकारी व अंमलदार यांचे स्वतंत्र पथक गठीत करण्यात आले. त्यानुसार पोनि गुन्हे आनंद कांबळे, सपोनि अनुरूद्ध गिजे, पोउपनि हर्षल राजपुत, पोहवा विजय देवरे, सुनिल कुदळे, महेश धुमाळ, शिवाजी बाबर, सतिश तांडेल, पोशि राजकुमार सोनकांबळे, आकाश भगत, भिमराव खताळ आदींच्या पथकाने कोणताही प्रत्यक्षदर्शी साक्षीदार नसताना सदर गुन्हयाचा तांत्रिक व गोपनिय माहितीद्वारे गुन्हयाचा सखोल व कौशल्यपुर्ण तपास करून सदर गुन्हयातील 2 आरोपींना निष्पन्न केले त्यामध्ये आरोपी कौशल पाटील व रणजित रामप्रकाश सोनी यांना ताब्यात घेवून त्यांच्याकडून गुन्ह्यातील चार वाहने हस्तगत करण्यात आली आहेत. अधिक चौकशीमध्ये अजूनही वाहने व इतर मुद्देमाल पोलीस हस्तगत करतील असा विश्वास तपास अधिकाऱ्यांनी व्यक्त केला आहे. दरम्यान हे आरोपी गुन्हे करून अटक झाल्यावर शिक्षा भोगून पुन्हा याच मार्गाचा अवलंब करतात व आतापर्यंत जवळपास 16 गुन्हे केल्याची प्राथमिक माहिती मिळत आहे. सदर आरोपींना दि. 7/02/2025 रोजीपर्यंत पोलीस कोठडी रिमांड देण्यात आलेली आहे.

====================



## पनवेल परिसरातील कोल्ही कोपर येथील पाणी प्रश्नावरुन शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांनी पाणीपुरवठा स्वच्छता मंत्री ना.गुलाबराव पाटील यांची भेट

**दैनिक युवक आधार**

**पनवेल, (वार्ताहर)**-पनवेल परिसरातील कोल्ही कोपर व भागातील पाणी प्रश्नासंदर्भात आज महाराष्ट्र राज्याचे शिवसेनेचे पाणीपुरवठा स्वच्छता मंत्री नामदार गुलाबराव पाटील यांची बाळासाहेब भवन मुंबई येथे शिवसेना पदाधिकाऱ्यांनी भेट घेऊन पाणी प्रश्न संदर्भात निवेदन दिले.यावेळी शिवसेना तालुकाप्रमुख ग्रामीण उरण विधानसभा क्षेत्राचे बाळासाहेब नाईक, महिला रायगड जिल्हाप्रमुख मेघाताई दमडे, शिवसेना वडघर विभागप्रमुख नाथाभाऊ भारवड व शिवसेना उपतालुकाप्रमुख उरण ग्रामीण क्षेत्र चंद्रकांत गुजर त्यांच्यासह इतर शिवसैनिकांनी भेट घेवून येथील पाणी प्रश्नासंदर्भात व्यथा मांडली. या प्रश्नाची तातडीने दखल ना.गुलाबराव पाटील यांनी घेवून संबंधित अधिकाऱ्यांना त्वरित फोन करून आवश्यक ते मार्गदर्शन करून पाणी प्रश्न सोडविण्याचे आदेश दिले.



## माता रमाईच्या जयंतीस हजारोच्या संख्येने उपस्थित रहावे... प्रशांत वाकळे

**दैनिक युवक आधार**

**परतूर- जालना (अशोक ठोके)**-दि.7 फेब्रुवारी रोजी माता रमाईची जयंती परतूर येथे मोठ्या थाटामाटात जयंती उत्सव समितीच्या वतीने साजरी करण्यात येणार आहे, रमाई जयंतीची मिरवणूक परतूर रेल्वे स्टेशन येथील सविंधान चौक येथून निघून डॉ.अंबेडकर नगर (गाव) येथे विसर्जन होणार आहे, तरी सर्व आंबेडकरी बांधवांनी व भगिनीनी पांढरे शुभ्र वस्त्र परिधान करून जयंतीच्या मिरवणुकीत ठीक सायंकाळी सहा वाजता रेल्वे स्टेशन, परतूर रेल्वे स्टेशन येथे हजर रहावे असे आवाहन माता रमाई जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष प्रशांत वाकळे यांनी सर्व आंबेडकरी जनतेला केले आहे, तसेच जयंती मध्ये कोनीही मद्यपान करून येवू नये, हि जयंतीआपल्यालाअत्यंत थाटामाटात, शांततेने साजरी करायची आहे, जयंतीमध्ये पोलिस बंदोबस्त राहणार आहे.



**दैनिक युवक आधार** (RNI NO :- MAHMAR/2023/89514) हे पत्रक मालक, प्रकाशक भारती संतोष आमले तसेच मुद्रक करणसिंग प्रल्हादसिंग सिरसवाल यांनी सिद्धि प्रिंटर्स, मंगल नगर मलकापूर पिन ४४३१०१ जि बुलढाणा येथे छापून दैनिक युवक आधार मुख्य कार्यालय २०३ इंद्रप्रस्थ रेसिडेन्सी ग्रामपंचायत जवळ मु पो आदई ता. पनवेल जि रायगड ४१०२०६ येथून प्रकाशित केले आहे. संपादक भारती संतोष आमले.

daily YUVAK ADHAR (**RNI NO :- MAHMAR/2023/89514**) Printed by Karansingh Pralhadsingh Siraswal and published by Bharti Santosh Amle on behalf of Bharti Santosh Amle and printed at Siddhi Printers, MANGAL NAGAR MALKAPUR PIN 443101 DIST- BULDHANA. And Published at Head Office daily YUVAK ADHAR, INRAPRASTH SOCIETY, ? WING FLAT NO. 203-202 SERVE NO 28/1/ 3 PANVEL RAIGAD, ADAI PANVEL DIST-RAIGAD, Editor Bharti Santosh Amle

# नेचर डिलाईट डेअरीवर आयकर विभागाची सलग दुसऱ्या दिवशी पण तपासणी

## तालुक्यात व्यवसाय मित्रबंधू मुळे कारवाई झाली ?




**दैनिक युवक आधार**

**सणसर :- विकास क्षत्रिय**–इंदापूर तालुक्यातील बेलवाडी येथील प्रसिद्ध उद्योजक अर्जुन हरिभाऊ देसाई यांच्या नेचर डिलाईट डेअरी परिवार व उद्योग समूहावर आयकर विभागाने सलग दुसऱ्या दिवशीही तपासणी सुरु ठेवल्यामुळे बेलवाडी,लासुर्णे भागातील देसाई समर्थक यांना धक्का बसला आहे.बुधवार सकाळ पासून चालू असलेल्या धाड सत्रामुळे परिसरात वेगळीच चर्चा चालू असल्याचे जाणवत आहे.ही कारवाई करण्यासाठी तालुक्यातील देसाई विरोधी गट एक झाल्याचे बोललं जात आहे.देसाई कुटुंबाकडून सर्वसामान्य नागरिकांना नेहमी सर्व प्रकारे मदत होत असते.कंपनीच्या सीएसआर फंडातून तालुक्यातीलच नव्हे तर राज्यातील गरजूंना देसाई परिवार मदत करत असतात.या उलट इंदापूर तालुक्यातील माळरान जागेवरती दूध प्रकल्प उभारून हजारो तरुणांना रोजगार उपलब्ध केल्याने व सर्वसामान्य जनतेला न्याय देण्याचा प्रयत्न केल्याचे दिसून येत असताना कोणत्या अकसापोटी नेचर डिलाईट डेअरी प्रकल्पावर कारवाई झाली हे समजून येत नाही. कारण अर्जुन हरिभाऊ देसाई हे विद्यमान उपमुख्यमंत्री अजितदादा पवार व इंदापूर तालुक्याचे कार्यसम्राट आमदार व विद्यमान मंत्री महोदय दत्तात्रय मामा भरणे यांचे निकटवर्तीय मानले जातात आणि अजित दादा सत्येमध्ये असताना देखील देसाई परिवारा वरती धाड पडते याचे नक्की कारण काय यामुळे इंदापूर तालुका व परिसरात तीव्र संतापाची लाट निर्माण झाली आहे.देसाई कुटुंबाने सामाजिक जाणिवेची भान ठेवून सतत समाजाला मदत केल्याने त्यांच्याविषयी जनतेत कृतज्ञेची भावना निर्माण झाली आहे.

**अर्जुन देसाई हे थोड्याच दिवसात राजकारणातुन एका मोठ्या पदावर जाणार असल्याची चर्चा मागील काही महिन्यात तालुक्यात रंगली होती.तालुक्यात आधीच आपल्या दुध व्यवसायातून थोडयाच दिवसात नावरूपाला आलेला नेचर उदयोग समूह यामुळे आपल्याला राजकारणात किंवा देसाई यांची जर राजकारणात इंट्री झाली तर आपल्याला त्याचा धोका निर्माण होईल याभीतीने विरोधक यांनी एकजुटीने केलेले काम आहे?असे देसाई समर्थक यांच्यात बेलवाडी परिसरातील गटा गटात चर्चा चालु आहे.**

## पाय काढलेल्या दीव्यांगाच्या घरी जाऊन मधु तारा ने केले कुबड्या वाटप



**दैनिक युवक आधार**

**पुणे वार्ताहर**-दिनांक 3 फेब्रुवारी 2025 रोजी मधु तारा दिव्यांग सेवा सोशल फाऊंडेशन महाराष्ट्र राज्य संस्थापक अध्यक्ष श्री नितीनजी शिंदे पुणे जिल्हा प्रमुख श्री अनिलजी दांगडे यांनी 13 ताडीवाला रोड भिम संघटना तरुण मंडळ नदी किनार पुणे येथील रहिवासी मालधक्का पुणे येथील हमाली काम करणाऱ्या श्री संजय साबळे यांचा गेंग्रिन मुळे पाय कट केला असता त्यांना त्यांच्या घरी जाऊन कुबड्या वाटप केल्या.मधु तारा पुणे दिव्यांग विभागाच्या पुणे शहराध्यक्षा मीनाक्षीताई शिंदे यांच्या सहकार्याने या कुबड्या उपलब्ध झाल्या.मधु तारा सोबती रिक्षा चालक श्री महेबुब शेख यांनी श्री साबळे यांना कुबड्या वाटप व्हावे म्हणून विनंती केली होती.या वेळी मधु तारा राज्यभरात दिव्यांगना घरी जाऊन सेवा देते याचा अभिमान वाटतो असे श्री महेबुब शेख म्हणाले.या वेळी श्री संजय साबळे यांना घरी येऊन मधु ताराने कुबड्या दिल्या बद्दल आनंदाश्रू अनावर झाले. या वेळी दिव्यागांची सेवा आमच्या हातून घडत आहे हे आमचे भाग्यच असे मधु तारा पुणे जिल्हा प्रमुख श्री अनिलजी दांगडे म्हणाले व या वेळी कुबड्यासाठी सहकार्य केल्याबद्दल मधु तारा शहराध्यक्षा मीनाक्षीताई शिंदे व श्री संजय साबळे यांच्या पर्यंत कुबड्या पोहोचवावे अशी विनंती करणाऱ्या मधु तारा सोबती रिक्षा चालक श्री महेबुब शेख यांचे आभार मधु तारा प्रमुख श्री नितीनजी शिंदे यांनी मानले.

## श्री गणेश मंदिर प्राणप्रतिष्ठा सोहळा

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल वार्ताहर** : पनवेल तालुक्यातील विहिघर येथील प्रयाग सिटी फेस वन या ठिकाणी श्री गणेश मंदिर प्राणप्रतिष्ठा सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते.यावेळी पुण्याहवाचन, मातृकापूजन, देवता स्थापन, हवन, तत्त्वन्यास आणि मूर्तीची प्रतिष्ठा करण्यात आली. यावेळी महिलांसाठी होम मिनिस्टर कार्यक्रमात आकर्षक बक्षीस ठेवण्यात आली होती. आणि महिलांसाठी लकी ड्रॉमध्ये एक मानाची पैठणी देण्यात आली. त्यानंतर दहावी, बारावी उत्तीर्ण मुलांचा आणि ज्येष्ठ नागरिकांचा, सोसायटी कमिटी, पदाधिकारी आणि सभासदांचा सत्कार करण्यात आला. अभंगवाणी आणि भक्ती गीते सादर करण्यात आली यावेळी प्रदीप कृष्णा भोपी, प्रिया प्रदीप भोपी, प्रयाग भोपी यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.



## तबब्ल तेरा तासानंतर आली वीज

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल वार्ताहर** : मंगळवारी पनवेल तालुक्यातील नेरे सह ग्रामीण भागातील वीज ग्राहकांना तब्बल 13 तासांचा विजेचा लपंडाव सहन करावा लागला. तेरा तासानंतर वीज पुरवठा पूर्ववत करण्यात आला. पनवेल तालुक्यात आजही कित्येक तास वीज गायब असते. याचा प्रत्यय मंगळवारी हजारो वीज ग्राहकांना आला. 4 फेब्रुवारी रोजी पहाटे पाच वाजता वीज गायब झाली. त्यामुळे कामावर आणि उद्योगधंदयावर जाणारे नागरिक याना प्रातःविधी अंधारातच उरकाव्या लागल्या. विज गेल्यामुळे अनेकांचा हिरमोड झाला. काही वेळानंतर वीज येईल या आशेत अनेक जण होते, मात्र दुपारी देखील विजेचा पत्ता नव्हता. अनेकांनी महावितरणच्या कार्यालयात संपर्क साधण्याचा प्रयत्न केला मात्र संपर्क झाला नाही. बालाजी सिंपनी सुकापूर ते आकुर्ली स्टॉपच्या मधोमध 3 ते 4 जागी केबल ब्रेक झाली होती त्यामुळे वीज पुरवठा खंडित झाला होता. हे काम करण्यासाठी तब्बल बारा ते तेरा तास लागले. त्यानंतर 13 तासानंतर विद्युत पुरवठा सुरळीत करण्यात आला. वीज नसल्याचा फटका अनेक नागरिकांना बसला.

## कामोठे येथे 'श्रीमदभागवत कथा "मध्ये"ईट प्ले रीडचा सहभाग

**दैनिक युवक आधार**




**नवीन पनवेल वार्ताहर**-कामोठे येथे श्रीमद्भाभागवत कथा सुरू आहे. यामध्ये इट प्ले रीडने सहभाग घेतला. भारताची ओळख ऋषि आणि कृषि प्रधान देश म्हणून मोठ्या स्तरावर आहे. कामोठे येथे श्रीमद् भागवत कथा सोहळा उत्साहात पार पडत आहे. या कथासारमुळे कामोठे नगरी हि भक्ती रसाने आणि कथा श्रवण विभोर होउन आनंदित झाली आहे. ईट प्ले रीड संस्थेच्या संस्थापक अपर्णा शहा यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यरत ईट प्ले रीडच्या रजदूतांनी या गौरवपुर्ण सोहळ्यामध्ये सहभागी होवून या अभियानाचा आवाज सर्व साम्यान्यापर्यंत आणि विशेष पद्धतीने भक्तगणांना आणि स्वयंम कथा वाचक महाराजांना हि दिला. भक्तगणांना आणी रुची असलेल्या सभोवतालच्या नागरिकांना या माध्यमातून "खा खेळा वाचा" अभियानाचा आवाज पोहचवण्यात राजदूताना यश आले. खा खेळा वाचा अभियानाचे राजदूत अजित पाण्डेय यांनी ही व्यवस्था पार पाडली.

## कविता
## माता रमाई

रमाई,ये जगी, जन्म तू घेऊनी
जीवन जगली तू,,चंदनापरी !!
नऊ वर्षाची रमा
झाली भिमाची रमा
भिकू धुत्रेची रमा
रामजीची सून रमा
संसारी ती आली सुख घेउनी
रमाई ये जगी जन्म तू घेउनी !
भोळी भाबडी रमा
दानी कष्टाळू रमा
आदर प्रेमाचा झरा
होती भिमाची रमा
नाव कमविले तिने तिच्या गुणांमुळे
रमाई ये जगी जन्म तू घेउनी !
भार त्या संसाराचा
सांभाळून रमा,
साथ दिली भीमाला
संकटाच्या रातीला
दिव्यासम जळूनी, तिने प्रकाश दिला
रमाई ये जगी जन्म तू घेउनी !
प्रेरणा त्यागाची ती
स्फूर्ती झाली भिमाची
उन्हातील संथ सावली
बघा ती माय माऊली
पती सेवेची ओढ मनी
तिने ठेविली
रमाई ये जगी जन्म तू घेउनी !

**कवयित्री**
**नम्रता खंदारे**
**( शिक्षिका )**
**न्यू वंडर किड्स इंग्लिश स्कूल परतुर.**

# मरणानंतरही जिवंत राहणाऱ्या गोष्टी

**- आसाराम विरकर,**
**उपसंपादक, दैनिक युवक आधार**
**(मराठवाडा आवृत्ती)**
**(विचार पुष्प – ३० वे)**

माणसाचा जन्म हा निसर्गाची एक सुंदर देणगी आहे. प्रत्येक जिवंत प्राणी हा एक दिवस मृत्यूला सामोरा जाणार, ही सृष्टीची अपरिवर्तनीय सत्यता आहे. विज्ञान आणि अध्यात्म दोन्ही मृत्यूच्या संकल्पनेला विविध प्रकारे समजावून सांगतात. शरीर एक दिवस नष्ट होते, पण काही गोष्टी मात्र मृत्यूनंतरही अजरामर राहतात.

**मृत्यूचा विज्ञान आणि जीवनावर प्रभाव**

माणूस मरण पावल्यानंतर त्याच्या शरीरातील विविध अवयव वेगवेगळ्या कालावधीत निष्क्रिय होतात. वैज्ञानिक दृष्टिकोनातून पाहता, हृदय मृत्यूच्या क्षणीच बंद पडते, मेंदू काही मिनिटे कार्यरत राहतो, डोळे ३१ मिनिटांमध्ये बंद होतात, आणि हाडे ३० दिवसांनंतर पूर्णतः नष्ट होतात. मात्र, माणसाने आपल्या आयुष्यात कमावलेली मने, दिलेले प्रेम, आणि केलेली मदत कधीही संपत नाही.

मृत्यू ही अशी गोष्ट आहे जी कोणालाही टाळता येत नाही. प्रत्येक जिवंत प्राणी जन्म घेतो आणि मग एका ठराविक वेळेनंतर मृत्यूला सामोरे जातो. मात्र, माणसाच्या बाबतीत हे काहीसे वेगळे असते. तो केवळ शरीराने जगत नाही, तर आपल्या विचारांनी, कृतींनी आणि संस्कारांनी इतरांच्या जीवनाचा भाग बनतो. म्हणूनच काही व्यक्ती शरीराने गेल्यानंतरही समाजात, इतिहासात आणि लोकांच्या हृदयात कायमस्वरूपी जिवंत राहतात.

**उत्तम विचार आणि कर्मांचे अमरत्व**

संत तुकाराम, संत ज्ञानेश्वर, महात्मा गांधी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांसारख्या महान विभूती आजही लोकांच्या हृदयात जिवंत आहेत, कारण त्यांनी आपल्या जीवनात समाजासाठी काहीतरी चांगले कार्य केले. त्यामुळे मृत्यू हा त्यांच्यासाठी केवळ एक घटना ठरली, पण त्यांचे विचार आणि कार्य अजूनही अनेकांना प्रेरणा देतात.

माणसाला भौतिक संपत्ती, मान–सन्मान, प्रसिद्धी मिळाली तरीही तो त्याच्यासोबत काही घेऊन जाऊ शकत नाही. पण त्याने आयुष्यभर लोकांशी जपलेले प्रेम, त्याने केलेली मदत आणि चांगले कर्म हे मात्र मृत्यूनंतरही टिकून राहते.

**आयुष्याचा खरा हेतू**–आजच्या धकाधकीच्या जीवनात माणूस मोठे ध्येय गाठण्याच्या प्रयत्नात कधी कधी आपल्या माणुसकीला हरवून बसतो. पैसा कमावणे आवश्यक आहे, पण तो कधीही आपल्या आठवणींमध्ये अमरत्व देऊ शकत नाही. मात्र, दिलेला मदतीचा हात, प्रेमाने केलेली वागणूक आणि प्रामाणिकपणे दिलेले मार्गदर्शन हे मात्र कायमस्वरूपी जिवंत राहते.म्हणूनच, आपण आयुष्य कशासाठी जगतोय, हे वेळोवेळी तपासणे आवश्यक आहे. जेव्हा आपण चांगली माणसे जोडतो, लोकांना मदतीचा हात पुढे करतो आणि समाजासाठी काहीतरी देण्याचा प्रयत्न करतो, तेव्हाच आपले जीवन खऱ्या अर्थाने यशस्वी ठरते.जर आपल्याला मृत्यूनंतरही अजरामर व्हायचे असेल, तर जीवनात चांगुलपणाचा मार्ग स्वीकारायला हवा. गरजूंना मदत करणे, लोकांसाठी काहीतरी सकारात्मक करणे, आणि माणुसकी जोपासणे हेच खरे जीवन आहे. कारण शेवटी, शरीर नष्ट होते, पण आठवणी आणि चांगले कर्म मात्र कायमस्वरूपी जगतात.

# जगायचं राहून नाही गेलं पाहिजे असं जगा

**आसाराम विरकर, उपसंपादक,**
**दैनिक युवक आधार (मराठवाडा आवृत्ती)**

जीवन हा एक सुंदर प्रवास आहे, जिथे प्रत्येक क्षण अनमोल असतो. पण हा प्रवास किती दिवसांचा असेल आणि केव्हा संपेल, हे कुणालाही ठाऊक नाही. म्हणूनच प्रत्येक क्षण संपूर्ण जोमाने, आनंदाने आणि सकारात्मकतेने जगायला हवा.आज अनेकजण आयुष्यातील छोट्या–छोट्या गोष्टींवर नाराज होतात, अबोला धरतात आणि स्वतःला एकटं करून घेतात. पण सत्य हे आहे की, रुसून, एकटं राहून किंवा दुःख साठवून ठेवल्याने आयुष्य थांबत नाही. उलट, आपणच आनंद शोधायचा असतो. ज्या गोष्टींवर आपण राग धरतो, त्याही एका क्षणी क्षुल्लक वाटतात. म्हणूनच, जोपर्यंत वेळ आहे, तोपर्यंत हसावं, बोलावं, जगावं!

**आनंद शोधायला शिका**

आनंद हा बाहेर नाही, तो आपल्या मनात आहे. मोठ्या स्वप्नांसाठी झटताना, रोजच्या छोट्या आनंदांचा त्याग करू नका. मोठं होताना श्रीमंतीचे स्वप्न पाहणारे लोक वृद्धापकाळात पुन्हा बालपणाच्या आठवणींमध्ये रमून जातात. म्हणूनच, पैसा मिळवणं गरजेचं असलं तरी, तो आयुष्याचा एकमेव उद्देश नसावा.

**बोलायला विसरू नका**–रुसलेल्यानेच बोलायचं असतं, नाहीतर आयुष्य निघून जातं.

**आठवणीच उरतात**–नाती जपा, कारण शेवटी तुमच्यासोबत तुमच्या आठवणीच राहणार आहेत.

**मन मोकळं ठेवा**–दुःख साठवून नका ठेवू, बोलून टाका, रडायचं असेल तर मोकळं रडा.

**मनाच्या इच्छांना वाट मोकळी करा**–नाचायचं असेल तर नाचा, गाणं म्हटलं तर म्हणा, आपलं जीवन मोकळेपणाने जगा.

**शेवटी हेच आठवतं–मी खरंच जगलो का?**

खूप लोक भविष्याच्या काळजीत वर्तमानाचा आनंद घ्यायलाच विसरतात. मात्र, शेवटी आयुष्य संपताना पश्चात्ताप नको, तर समाधान हवं. जगायचं असेल, तर आनंदाने जगा, दुसऱ्यांनाही आनंदी ठेवा आणि असे जगा की, अखेरच्या क्षणी "जगायचं राहून गेलं नाही" असं वाटायला नको.

**"जगायचं राहून नाही गेलं पाहिजे असं जगा!"**

# 2.5 वर्षांच्या कर्णबधीर मुलीला मिळाली श्रवणशक्ती

## नवी मुंबईतील खारघरच्या मेडिकवर हॉस्पिटलमध्ये यशस्वी कॉक्लियर इम्प्लांट शस्त्रक्रिया

**दैनिक युवक आधार**

**पनवेल, (वार्ताहर)** –जन्मजात कर्णबधिर रुग्णांसाठी अत्यंत महत्त्वाची अशी कॉक्लियर इम्प्लांट ही शस्त्रक्रिया ही पहिल्यांदाच नवी मुंबईतील खारघरच्या मेडिकवर हॉस्पिटलमध्ये यशस्वीरित्या पार पडली आहे. मेडिकवर हॉस्पिटलमधील ईएनटी सर्जन डॉ. राजेंद्र वाघेला यांच्या नेतृत्वाखालील तसेच डॉ. संजीव बधवार (घऊ–क) यांच्या मार्गदर्शनाखाली टिमने जन्मजात श्रवणशक्ती कमकुवत असलेल्या 2.5 वर्षांच्या बाळावर यशस्वी कॉक्लियर–इम्प्लांट शस्त्रक्रिया केली. अतिशय नाजूक समजल्या जाणार्‍या कॉक्लियर इम्प्लांट शस्त्रक्रियेद्वारे कानाच्या मागील हाडामध्ये एक यंत्र बसविले जाते. ज्यामुळे कर्णबधिरता दूर करण्यास मदत होते.महाड येथे राहणार्‍या अडीच वर्षीय अनिका (नाव बदलले आहे)* हिची जन्मतःच श्रवणशक्ती कमकुवत होती. ती मानसिक आणि बौध्दीकदृष्ट्या सक्षम असूनही ऐकू आणि बोलता येत नसल्यामुळे अनेक अडचणींचा सामना करत होती. टाळ्या वाजविल्यास किंवा खेळताना ती योग्य प्रतिसाद देऊ शकत नव्हती. तिच्या पालकांनी एका ऑडिओलॉजिस्टचा सल्ला घेतला आणि वयाच्या पहिल्याच वर्षी तिची बेरा (इएठ–) चाचणी करण्यात आल्या. बेरा चाचण्यांमुळे जन्मजात बहिरेपणा तात्काळ स्पष्ट होऊ शकतो. महाडमध्ये सुविधांची उपलब्धता नसल्याने आणि कुटुंबाची सामाजिक–आर्थिक स्थिती कमकुवत असल्याने तिच्यावर त्वरीत उपचार झाले नाही. सुदैवाने, तिच्या पालकांनी मेडिकवर हॉस्पिटलशी संपर्क साधला आणि मग इथुन पुढे तिचा नवा प्रवास सुरु झाला. डॉ. राजेंद्र वाघेला( ईएनटी आणि एंडोस्कोपिक सर्जन) सांगतात की, या बाळाला जन्मजात श्रवणदोष होता. जन्मानंतरच्या पहिल्या वर्षात बाळाला श्रवणदोषाचे निदान झाले असले तरी, आर्थिक अडचणींमुळे त्यांना लवकरात लवकर उपचार करता आले नाहीत. सुमारे 1000 मुलांपैकी 5 ते 6 मुलांमध्ये श्रवणदोषाच्या समस्या आढळून येतात. सर्व नवजात बाळांची ज–ए (ओटो–ॲकॉस्टिक इमिशन्स) तपासणी करणे खूप गरजेचे आहे. त्यात जर काही समस्या आढळून आली तर बेरा (इएठ–) चाचणी करणे गरजेचे आहे. ही चाचणी केल्यानंतर उजवा आणि डाव्या कानाची ऐकण्याची क्षमता किती आहे हे श्रवण आलेखाद्वारे समजते, श्रवण आलेखावरून कर्णबधिर व्यक्तींचं अपंगत्व किती आहे हे ठरवले जाते. याचे वेळीच निदान करणे गरजेचे असून वयाच्या तीन वर्षांच्या आत शस्त्रक्रिया करावी कॉक्लिअर इम्प्लान्ट ही शस्त्रक्रिया कमी वयाच्या मूक– बधीर / कर्णबधीर रुग्णांसाठी वरदान आहे. 'कॉक्लिअर इम्प्लान्ट' हे एक लहान स्वरुपाचे इलेक्ट्रॉनिक उपकरण आहे. ते बसविल्यामुळे लहान मुलांमधील कर्णबधिरता दूर होण्यासाठी मोठ्या प्रमाणात मदत होते. वरील प्रकरणात वेळीच निदान आणि उपचार केल्याने चिमुरडीला श्रवण क्षमतेचे वरदान मिळाले. कॉक्लियर इम्प्लांटने गंभीर श्रवणदोष असलेल्या रुग्णांना नवे आयुष्य मिळते.



मुंबईसारख्या शहरी भागात अशा शस्त्रक्रिया उपलब्ध आहेत, परंतु नवी मुंबई आणि रायगडमध्ये या प्रक्रिया दुर्मिळ आहेत.कॉक्लियर इम्प्लांट (उख) शस्त्रक्रियेसाठी पात्र ठरल्यानंतर या रुग्णाची सखोल तपासणी करण्यात आली आणि शस्त्रक्रियेसाठी तिला तयार करण्यात आले. अतिशय नाजूक समजल्या जाणार्‍या कॉक्लियर इम्प्लांट शस्त्रक्रियेद्वारे कानाच्या मागील हाडामध्ये एक यंत्र बसविले जाते. त्याद्वारे बाहेरील ध्वनिलहरीचे इलेक्ट्रिक ध्वनिलहरीत रूपांतर होऊन जन्मजात कर्णबधिर बालकाला ऐकू येण्यास चालना मिळते.डॉ. राजेंद्र वाघेला( ईएनटी आणि एंडोस्कोपिक सर्जन) पुढे सांगतात की, या यशस्वी प्रक्रियेने तिला ऐकू येऊ लागले असून तिला ऐकुन बोलता यावे यासाठी एव्हीटी थेरपी (–तढ– र्‍–ीवर्ळीीं तशीलरश्र ढहशीरिू) गरजेची आहे. कारण तिचे ऐकण्याचे वय अजूनही 3 महिन्यांच्या बाळासारखे आहे. यामुळे या थेरेपीने ती सर्वसामान्य मुलांसारखे जीवन जगू शकते. स्वयंसेवी संस्थेच्या मदतीने मेडिकवर हॉस्पिटलमध्ये कॉक्लियर इम्प्लांट (उख) शस्त्रक्रिया मोफत केली जाते. नवी मुंबई आणि रायगड भागातील रुग्णांना उत्तमोत्तम आरोग्यसेवा मिळाव्यात याकरिता मेडिकवर रुग्णालय नेहमीच प्रयत्नशील असते. यशस्वी शस्त्रक्रिया आणि त्यानंतरच्या थेरपीमुळे रुग्णाची ऐकण्याची आणि बोलण्याची क्षमता विकसित होण्यात मदत होईल. यामुळे या बाळाला सामान्य आयुष्य जगता येईल तसेच शाळेत जाता येईल आणि तिला तिची स्वप्नं पूर्ण करण्यासाठी कोणतेही अडथळे येणार नाही.रुग्णाच्या पालकांनी या प्रवासाबद्दल आपल्या भावना व्यक्त करतना सांगितले, जेव्हा आमची मुलगी टाळ्या वाजविल्यानंतर ,गाणी ऐकवल्यावर, शिट्ट्या वाजविल्यावर किंवा खेळण्यांचा आवाजाला प्रतिसाद देत नव्हती तेव्हा तिला पाहून आम्ही खुप खचून गेलो होतो. तिच्या सभोवतालच्या जगाला प्रतिसाद देण्यासाठी तिला करावा लागणारा संघर्ष पाहणे हे आमच्यासाठी खरोखरच वेदनादायक होते. तिला ऐकू येत नसल्याने किंवा बोलता येत नसल्याने तिला भविष्यात अनेक समस्यांना सामोरे जावे लागेल याचा विचार करुनच आम्ही खुप घाबरुन गेलो होते. पण कॉक्लियर इम्प्लांट शस्त्रक्रियेनंतर मात्र ही परिस्थिती पूर्णपणे बदलली.या संपुर्ण प्रवासात आमच्या सोबतीने उभ्या असलेल्या मेडिकवर हॉस्पिटलच्या संपुर्ण टिमचे आम्ही आभार मानतो. आता आमची मुलगी एक सामान्य व आनंदी जीवन जगू शकेल अशी आम्ही आशा करतो.

## परभणी ते मुंबई लाँग मार्च मोर्चाचे निफाडला चक्काजाम आंदोलन

**दैनिक युवक आधार**

**निफाड प्रतिनिधी/राहुल कुलकर्णी**–भारतीय संविधानाच्या प्रतिकृतीची विटंबना केल्याप्रकरणी परभणी शहरात हिंसाचार भडकल्यानंतर न्यायालयीन कोठडीत मृत्यू झालेल्या सोमनाथ सुर्यवंशी यांना न्याय मिळावा यासाठी महाराष्ट्राच्या परभणी जिल्ह्यातून लाँग मार्च काढण्यात आला आहे. ही रॅली निफाड येथे पोहचली यावेळी छत्रपती शिवाजी महाराज व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार घालण्यात आला व घोषणा देण्यात आल्या. यावेळी निफाड शहरातील तसेच मोर्चेकर्‍यांनी मोर्चा निफाड चौफुलीवर पोहोचतात रस्त्यावर बसून घेत सरकारच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी केली, त्यामुळे काही काळ वाहतूक ठप्प झाली होती. बऱ्याच वेळानंतर पोलिसांच्या मध्यस्थीने मोर्चा मुंबईच्या दिशेने रवाना झाला.मोर्चाचे नेतृत्व आशिश वाकोडे मा.जी.महापौर रवि सोनकांबळे. सिध्दार्थ भराडे. सुधिर साळवे .निलेश डुमणे .प्रदीप वावळे. सचिन खङताळे. सागर निकाळे.राजेश लोखंङे. विलास खङताळे. काशीनाथ हीरे.नंदु आहीरे.हेमंत खङताळे,सूहास सुरळीकर.शामराव पगारे.सिध्दार्थ आहीरे. जनार्दन पगारे.बाजीराव गायकवाङ.विकास खङताळे. विनोद कुरवाळे.दादाभाऊ काऊतकर.आदी उपस्थितीत होते.



## नेरूळ उरण लोकल बंद पडल्याने प्रवाशांना भोगावा लागला नाहक त्रास

**दैनिक युवक आधार**

**उमाकांत पानसरे/उरण प्रतिनिधी**-आज दिनांक 6 फेब्रुवारी 2025 नेरुळ ते उरण धावणारी दुपारी 3:45 वाजताची लोकल नियोजित वेळेवर निघाली आणि प्लॅटफॉर्म सोडल्यावर काही मिनिटाच्याअंतरावर बंद पडली. पुढची ट्रेन एका तासाच्या अंतराने असल्यामुळे सर्व प्रवासी पुन्हा नेरूळ प्लॅटफॉर्म कडे धाव घेऊन बेलापूर स्टेशन कडे 4 :27 ची लोकल पकडण्या करिता धावपळ करताना विशेषत महिलांची खूपच दमछाक झाल्याचे चित्र पाहवयास मिळत होते.... परंतु लोकल का बंद पडली याच उत्तर काही कळेना मध्य रेल्वे प्रशासनाने याची दखल घ्यावी अशीच प्रवाशांची मागणी आहे रस्त्यावरून धावणाऱ्या महानगरपालिकेच्या बसेस मध्येच बंद पडताना दिसतात. तशाच प्रकारचा रेल्वेच्या प्रवाशांना अनुभव आला आहे अशी प्रवाशांमध्ये चर्चा होती.

=========================

## संतोष गोविंदराव पाटील भायेगावे यांची पत्रकार पप्पु वाघमारे निवळीकर यांनी हैंडगा वडापाव व पावभाजी सेंटर येथील सदिच्छा भेट

**दैनिक युवक आधार**
**नांदेड प्रतिनिधी**

**चंद्रशेखर वाघमारे पपु निवळीकर/नांदेड-** देगलूर संतोष गोविंदराव पाटील भायेगावे अरुना संतोष भायेगावे गाव भक्तापुर तालुका देगलूर जिल्हा नांदेड सर्व सामन्य शेतकरी कुटुंबातील मी व माझी पत्नी सुरुवातीला हैद्राबाद येथे काम करावयास गेलो होतो तेव्हा आवड म्हणून सोशल मिडीया वरती हास्य मनोरंजनाचे व्हिडिओ बनवण्यास सुरुवात केली व अस्सल गावरान भाषा असल्यामुळे लोकांचा प्रतीसाद आणि भरभराटून प्रेमा मुळे मि आज इंस्टाग्राम 300000 तिन लाख फॉलोवर्सव फेसबुक 200000 दोन लाख फॉलोवर्सव युट्युब 50000 हजार फॉलोवर्सव झाले

असून मला या मनोरंजनामध्ये लोकांच्या प्रतिसादामुळे आणि प्रेमामुळे सोशल मीडिया वरती मि व माझी पत्नी आम्ही दोघांनी मिळून सोशल मीडिया वरती दीड वर्ष पूर्ण केलो आहे नांदेड जिल्ह्यातील देगलूर तालुका येथे मि माझे हैंडगा वडापाव पावभाजी सेंटर नूतन 2 महिन्यांपूर्वी चालू केलो आहे. तरी लोकांचे प्रतीसाद व प्रेम खुप माझ्यावरती आहेत असेच रावावेत हि माझी इच्छा आहे. व माझे जिवलग सहकारी मित्र पप्पू पाटील सुरनर जिरंगेकर यांच्ये सुधा सहकार्य आहे. तरी लवकरच हेंडगा वडापाव पावभाजी सेंटरचे दुसरे शाखा संपूर्ण महाराष्ट्रात देणार आहोत. आमची हि शाखा रजिस्ट्रेशन केली आहे एकदा येऊन आमच्या हैंडगा वडापाव पावभाजी चविष्ट सेंटर येथे येऊन भेट द्या आपला हैंडगा हास्य मनोरंजन करता संतोष पाटील भायगावे








## बोरिवलीच्या 15 छोट्या कराटे चॅम्पियन्स ला घवघवीत यश

**दैनिक युवक आधार**
**किशोर गुडेकर/मुंबई / प्रतिनिधी प्रमुख**

दि. ४, मुंबई,
वर्ल्ड फुनाकोशि शोटोकन कराटे ऑरगेनयझेशन (WFSKO) च्या माध्यमातून ३० वी खुली युरो आशिया इंटर नॅशनल कराटे चॅम्पियनशिप स्पर्धा मुलुंड येथील प्रिय दर्शनी स्पोर्ट्स कॉम्पलेक्स मध्ये भरविण्यात आली होती.यां स्पर्धेत बोरिवलीतील स्पोर्ट्स मार्शल आर्ट अकॅडमी इंडिया च्या काटा आणि कुमिटे या स्पर्धेत तब्बल १५ विद्यार्थ्यांनी सुवर्ण, रौप्य आणि कास्य पदके पटकावून बोरिवलीच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला. यां चिमुकल्या कराटे चॅम्पियनशिपवर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.मुलुंड येथे झालेल्या ३० व्या युरो आशिया ओपन कराटे चॅम्पियन्सशिप यां स्पर्धेत भारतासह आणि १० देशांतील स्पर्धकानीं भाग घेतला होता.भारताचे हंसी हासन महंम्मद यांच्या प्रेरणेने स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत बोरीवलीच्या जुनी एम एच बी वसाहत येथील सियान सुहास परब यांच्या स्पोर्ट्स मार्शल आर्ट अकॅडमीच्या यतीन डोंगरीकर आणि मनीष परब यांच्या मार्गदर्शनाखाली १५ विध्यार्थ्यांनी भाग घेतला होता. सर्व विद्यार्थ्यांनी हेवा वाटेल असे यश संपादन केले आहे. या १५ विध्यार्थ्याने एकूण १५ सुवर्ण, १२ रोप्य आणि ४ कास्य पदके मिळवली.या यशस्वी आंतरराष्ट्रीय कराटे चॅम्पियन्सचा जुनी एमएचबी कॉलनी येथील दत्त मंदिर येथे मनसे चे विभाग अध्यक्ष कुणाल माईनकर, महिला उप विभाग अध्यक्षा अपेक्षा पवार, पत्रकार अनिल चासकर, चिराग मांडे, सागर दळवी, कुणाल विचारे, महादेव नवलू यांच्या हस्ते पदक, ट्रॉफी व प्रशस्तीपत्रक देऊन सत्कार करण्यात आला.








६ वर्षा खालील
आद्या संखे – सुवर्ण / सुवर्ण.
ओजस्वी शिंदे– सुवर्ण / रौप्य.
कृष्णन ढकोलीयां रौप्य / कास्य. अर्णव परब – दोन सुवर्ण.
८ वर्षाखालील
निलराज ताटे सुवर्ण / रौप्य.
धैर्य खराडे रोप्य / कास्य.
९ वर्षा खालील
स्पृहा डोंगरीकर – दोन सुवर्ण.
जानव्ही भोसले – रौप्य / कास्य.
१० वर्षा खालील.
लावण्य कोरले सुवर्ण / रौप्य.
साई साठे सुवर्ण / रौप्य.
१२ वर्षाखालील
अर्णव रानडे सुवर्ण /रौप्य.
आदित्य मोरे सुवर्ण / रौप्य.
१५ वर्षा खालील
अनुष्का परब सुवर्ण / रौप्य.
जानव्ही परंब सुवर्ण / रौप्य.
यश राऊत सुवर्ण / रौप्य.

## एल्फिन्स्टन रेल्वे पूल पाडण्यासाठी १ मार्चचा मुहूर्त

### आंबेडकर रोडवरील कामे महिनाअखेर पूर्ण करण्याचे पालिका आयुक्तांचे निर्देश

**मुंबई :** एल्फिन्स्टन रेल्वे पूल पाडण्यासाठी मुंबई महानगरपालिकेने १ मार्चच्या मुहूर्तावर शिक्कामोर्तब केला आहे. त्यामुळे परळ विभागातील आंबेडकर मार्गावर आणि आजूबाजूला सुरू असलेली कामे फेब्रुवारी अखेरीस पूर्ण करण्याचे निर्देश पालिका आयुक्त तथा प्रशासक भूषण गगराणी यांनी दिले आहेत.

शिवडी-वरळी न्हावाशेवा उन्नत मार्गिका प्रकल्पाच्या कामाकरिता प्रभादेवीचा ( एल्फिन्स्टन रेल्वे ) पूल पाडण्याबाबत नुकतीच महापालिका, टाटा, जिओ यांच्यात संयुक्त बैठक पार पडली असून मार्चमध्ये पूल पाडण्याचा निर्णय जवळपास निश्चित झाला आहे. त्यामुळे महानगरपालिकेमधील विविध विभागातील अधिकारी, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, भोईवाडा वाहतूक विभाग व उपयोगिता संस्थेचे प्रतिनिधी यांच्या समवेत नुकतीच या पुलाची संयुक्त स्थळ पाहणी करण्यात आली. स्थळ पाहणी दरम्यान झालेल्या चर्चेनुसार महानगरपालिकेच्या सहाय्यक अभियंता (रस्ते) एफ/दक्षिण विभाग, सहाय्यक अभियंता (प.ज.वा.) एफ/ दक्षिण, टाटा पॉवर कंपनी व सहाय्यक अभियंता (जलकामे) एफ/दक्षिण, कार्य अभियंता (प्रचलन व परिरक्षण) मलनिःसारण स्थापत्य शहर, कार्य. अभियंता (प. ज. वा.) बांधकामे, जिओ टेलिकॉम कंपनी यांच्यामार्फत सुरू असलेली कामे फेब्रुवारीअखेरीस पूर्ण करण्याचे निर्देश यावेळी देण्यात आले.



#### नवीन रस्ते खोदण्याला परवानगी नाही

एल्फिन्स्टन रेल्वे पूल १ महिन्यानंतर निष्कासन करण्याबाबत निर्णय घेण्यात येणार आहे. या १ महिन्याच्या कालावधीमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर रोड व लगतच्या सर्व रस्त्यांवरील चालू असलेली विकासकामे १ महिन्याच्या आत पूर्ण करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. जेणेकरून एल्फिन्स्टन रेल्वे पूल निष्कासित केल्यानंतर सदर विभागातील वाहतूक सुरळीत करण्यात येईल. तसेच नवीन कोणतेही रस्ते खोदण्यासाठी परवानगी न देण्याचे आदेशही यावेळी देण्यात आले आहेत, अशी माहिती पालिकेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दिली.

#### फेब्रुवारीअखेरीस रस्ता चालू करण्यासाठी उपाययोजना करा

डॉ. बाबासाहेब आंबेडकर रोड व लगतच्या सर्व रस्त्यांवरील सुरू असलेली कामे महिना अखेरपर्यंत पूर्ण करण्यात यावी, तसेच, सुरू कामांना अधिक कालावधी आवश्यक असल्यास फेब्रुवारी अखेर रस्ता चालू करण्यासंबंधी उपाययोजना करण्यात याव्यात, असे सक्त निर्देशही महापालिका प्रशासनाच्या वतीने देण्यात आले आहेत.



## पनवेल महाविद्यालयाच्या पार्थ मानेची ३८ व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत गगनभरारी, १० मीटर एअर रायफल प्रकारात पटकाविले सुवर्णपदक

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल वार्ताहर**:पनवेल येथील रयत शिक्षण संस्थेच्या महात्मा फुले कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात बारावी विज्ञान शाखेत शिकत असलेल्या पार्थ राकेश माने याने नुकत्याच उत्तराखंड येथे पार पडलेल्या ३८ व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत १० मीटर एअर रायफल प्रकारात सुवर्णपदकाला गवसणी घातली आहे. केंद्र शासनाच्या क्रीडा विभागाकडून दरवर्षी या राष्ट्रीय स्तरावरील क्रीडा स्पर्धांचे आयोजन केले जाते. देशभरातील विविध राज्यांतील राज्यस्तरीय स्पर्धांमध्ये पदकांची कमाई करणाऱ्या खेळाडूंना या राष्ट्रीय स्पर्धेत खेळण्यासाठी पात्र ठरविले जाते. अशा मातब्बर खेळाडूंशी टक्कर देत महाराष्ट्र राज्याचे प्रतिनिधित्व करताना पार्थने वयाच्या १७ व्या वर्षी मिळविलेले हे यश देशातील युवकांना प्रेरणा देणारे आहे. आंतरराष्ट्रीय कीर्तीच्या नेमबाज सुमा शिरूर यांच्या मार्गदर्शनाखाली त्याने हे भव्यदिव्य यश संपादन केले. त्याच्या या उज्ज्वल यशामुळे पनवेल महाविद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला गेला आहे. पार्थ माने याच्या सुवर्ण कामगिरीबद्दल प्रतिक्रिया देताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गणेश ठाकूर म्हणाले की, महाविद्यालयाच्या क्रीडा क्षेत्रातील आतापर्यंतची ही सर्वोच्च कामगिरी आहे. याआधीही जिमखाना विभागातील खेळाडूंनी अनेक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये पदकांची लयलूट केली आहे परंतु नेमबाजीसारख्या अवघड व तांत्रिक क्रीडा प्रकारात पार्थने केलेली सुवर्णपदकाची कमाई सर्वोत्तम अशीच म्हणावी लागेल. रयत शिक्षण संस्थेलाही पार्थच्या या कामगिरीचा नक्कीच गौरव वाटेल. या आनंदाच्या प्रसंगी त्यांनी पार्थ मानेचे व त्याच्या कुटुंबियांचे विशेष अभिनंदन केले व पुढील वाटचालीसाठी त्याला शुभेच्छा दिल्या.पार्थ माने याच्या या यशाबद्दल रयत शिक्षण संस्थेचे चेअरमन चंद्रकांत दळवी, सचिव विकास देशमुख, महाविद्यालय विकास समितीचे चेअरमन रामशेठ ठाकूर, रयत शिक्षण संस्थेच्या रायगड विभागीय सल्लागार समितीचे चेअरमन बाळाराम पाटील, जे. एम. म्हात्रे, महेंद्र घरत, अरुण भगत, महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थी मंडळाचे अध्यक्ष परेश ठाकूर तसेच शिवछत्रपती पुरस्कार विजेते सूर्यकांत ठाकूर व संजय कडू आदी मान्यवरांनी विशेष कौतुक केले. यासोबतच समाजाच्या विविध स्तरांतून विद्यार्थ्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे.पार्थच्या या सुवर्ण कामगिरीबद्दल महाविद्यालयाच्या जिमखाना कमिटीचे चेअरमन डॉ. प्रफुल्ल वशेणीकर, उपप्राचार्य डॉ. राजाराम पाटील, उपप्राचार्य डॉ. नामदेव पवार, कनिष्ठ महाविद्यालयाच्या विज्ञान विभागाच्या इंचार्ज सौ. सुनिता काटकर, कला व वाणिज्य विभागाचे इंचार्ज डॉ. विलास विशे, आयक्यूएसी समन्वयक प्रा. सोपान गोवे, रजिस्ट्रार श्री. अनंता जाधव, प्रा. सुनील अवचिते, डॉ. यशवंत उलवेकर, प्रा. प्रवीण गायकर, प्रशिक्षक श्री. अक्षय जितेकर, कनिष्ठ महाविद्यालयाचे क्रीडा शिक्षक श्री. एस. डी. बडे व जिमखाना कमिटीतील सर्व सदस्यांनी त्याचे विशेष अभिनंदन केले.

## जिंतीच्या चिमुकल्या विद्यार्थ्यांनी सुंदर हस्ताक्षर काढून दाखवली वेगळी कला !

### सुंदर हस्ताक्षर काढण्यात रमले विद्यार्थी

**दैनिक युवक आधार**

**पनवेल वार्ताहर-**श्री ज्योतिर्लिंग विद्यालय जिंती या विद्यालयात सुंदर हस्ताक्षर कार्यशाळेचा प्रारंभ आज बुधवार दिनांक 5 फेब्रुवारी 2025 रोजी झाला या प्रकल्पाचे प्रशिक्षक आहेत सन्माननीय सुहासदादा प्रभावळे सर विद्यालयाच्या वतीने सन्माननीय सुहास दादांचे त्यांचे स्वागत करण्यात आले. सुंदर हस्ताक्षर प्रकल्पात, अक्षरातून कलेची किमया कशी साधता येते याविषयी प्रास्ताविक करून गणेशाच्या प्रतिकृतीत आपले नाव किंवा विद्यालयाचे नाव रेखाटता येते याचे प्रात्यक्षिक सुहास दादांनी विद्यार्थ्यांना दाखविले. या कार्यशाळेचे प्रायोजक ज्ञान प्रबोधिनी फाउंडेशन जिंती असून फाउंडेशन च्या वतीने सर्व विद्यार्थ्यांना दुरेघी वही आणि जेल पेन मोफत देण्यात आले या कार्यशाळेत श्री ज्योतिर्लिंग विद्यालयाचे 55 विद्यार्थी सहभागी असून जिल्हा परिषद प्राथमिक शाळा जिंतीचे 70 विद्यार्थी सहभागी आहेत. सुंदर हस्ताक्षराचे महत्त्व याचा व्यक्तिमत्त्वाशी संबंध, भविष्यात होणारा फायदा आणि गरज या बाबीचा माहिती या कार्यशाळेत देण्यात आली विद्यार्थ्यांना हस्ताक्षर सुधारण्याचा केवळ शालेय परीक्षांपुरता उपयोग नसून, ते त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला एक सुसंस्कृत आणि आकर्षक रूप देण्यास मदत करेल, असे सांगितले. सुंदर हस्ताक्षराचे महत्त्व विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासात अत्यंत महत्वाचे ठरते. चांगले हस्ताक्षर हे केवळ एक शालेय आवश्यकता नाही, तर ते एक प्रकारचे व्यक्तिमत्त्व आणि आत्मविश्वासाचे प्रतीक बनते. या कार्यशाळेने विद्यार्थ्यांना हस्ताक्षराच्या कलेला एक नवा दृष्टिकोन दिला आहे, ज्यामुळे त्यांच्या लेखनातील सौंदर्य आणि स्पष्टता सुधारू शकते. कार्यशाळेचे आयोजन यशस्वी झाले असून, या प्रकारच्या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना कला आणि शिक्षणाच्या महत्त्वपूर्ण पैलूंचा शोध घेता येईल. या कार्य शाळेसाठी सहकार्य करणाऱ्या विद्यालयाचे सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी आणि ज्ञान प्रबोधिनी फाउंडेशनचे धन्यवाद.



## नळदुर्ग येथील पत्रकार श्री.आयुब शेख यांना राज्यस्तरीय परिवर्तन पुरस्कार देण्यात आला..

**दैनिक युवक आधार**

**संतोष पुदाले/तुळजापूर:** धाराशिव-तुळजापूर तालुक्यातील नळदुर्ग चे मीडिया पत्रकार श्री. आयुब शेख यंदाचा राज्यस्तरीय परिवर्तन पुरस्काराने मान्यवराच्या हस्ते सन्मानित करण्यात आला धाराशिव जिल्ह्यातील विविध विषयाला हाताळत गरजू व पिडितांचा आधार बनवून आपल्या माध्यमातून न्याय मिळवून देण्यासाठी धडपडणारा पत्रकार म्हणून आयुब शेख यांच्याकडे बघितले जातं समाज प्रबोधन व परिवर्तनासाठीच आपला अतुलनीय कामगिरी समाजाला एक वेगळ्या उंचीपर्यंत घेऊन जाईल याचा आम्हास विश्वास आहे आपल्या या पत्रकार क्षेत्रातील अविरात सेवावृतीचा गौरव करण्यासाठी संस्थेच्या वतीने आपणास राज्यस्तरीय परिवर्तन पुरस्कार व सन्मानपत्र देऊन सन्मानित करीत आहोत असे ज्येष्ठ समाजसेवक मा.श्री. पन्नालाल भाऊ सुराणा यांनी आयुब शेख यांना पुरस्कार प्रदान करताना म्हणले यावेळी संस्थेचे अध्यक्ष अँड. बाबासाहेब वाढवे अँड .रामचंद्र ढवळे मारुती बनसोडे यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते आपलं घर प्रकल्प आलियाबाद या ठिकाणी हा कार्यक्रम संपन्न झाला कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून श्री. पन्नालाल भाऊ सुराणा होते तर प्रमुख मार्गदर्शक प्रा. डॉ .सुरेश वाघमारे डॉ .मिलिंद वाकोडे पुणे ( रो.नि. मुख्य कार्यकारी अधिकारी खादी कामोधो भारत सरकार) मा. अँड.मैना (तृप्ती) भोसले वडणे सदस्य महाराष्ट्र राज्य बालकल्याण समिती धाराशिव दत्तात्रय लांडगे उपजिल्हा शिक्षण अधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद सदाशिव मा.प्रा.राजा सोनकांबळे एसएनडीटी महिला जुनियर कॉलेज पुणे तसेच आणि पुरस्कार मानकरी प्रतिष्ठान नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते




## मातृतीर्थ सिंदखेडराजा नगरीतील मातोश्री मंगल कार्यालय येथे बहुजन साहित्य संघाचे साहित्य संमेलन २०२५. संपन्न होणार

**दैनिक युवक आधार**

**सिंदखेड राजा :-** ब.सा.संघाच्या वतीने सिंदखेड राजा येथे एक तातडीची छोटेखानी बैठक घेण्यात आली. त्यामध्ये बहुजन साहित्य संघाच्या ३१ मार्च, २०२५ रोजी मातृतिर्थ सिंदखेड राजा येथे नियोजित असलेल्या सहाव्या राज्यस्तरीय साहित्य संमेलनाच्या सोहळ्यासाठी सुंदर, आकर्षक व योग्य असे ठिकाण ठरवण्याबाबत विचार विनिमय करण्यात आला. एवढेच नाही तर त्या निमित्ताने सिंदखेड राजा येथील मातोश्री मंगल कार्यालय येथे ब. सा. संघाचे अध्यक्ष डॉ. विजयकुमार कस्तुरे यांनी संघाचे पदाधिकारी व दैनिक लोकनेता चे संपादक ज्ञानेश्वर बुधवत यांच्यासह भेट देऊन स्थानिक मातोश्री मंगल कार्यालयाचे मालक संचालक मा. शिवप्रसाद ठाकरे यांच्याशी चर्चा करून मातृतिर्थ सिंदखेड राजा नगरी खऱ्या अर्थाने विकासापासून वंचित असल्या कारणाने महाराष्ट्रातील सूज्ञ साहित्यिकांच्या व विचारवंतांच्या नजरेस ही वस्तुस्थितीआणून देणे व शासनाचे या मुद्द्यावर लक्ष केंद्रित करणे यासाठी होत असलेल्या ब. सा. संघाच्या प्रस्तावित साहित्य संमेलनाची रूपरेषा व उद्दिष्ट त्यांच्यासमोर विषद केली. व दि. ३१ मार्च, २०२५ रोजी मातोश्री मंगल कार्यालय सदर संमेलन सोहळ्यासाठी उपलब्ध करून देण्याची विनंती केली. आणि त्यांनी सुद्धा अत्यंत मोठ्या मनाने त्या विनंतीचा मान ठेवून, अशा ऐतिहासिक व अविस्मरणीय तथा वैशिष्ठ्यपूर्ण संमेलनासाठी मातोश्रीचा हातभार लागण्याची संधी मिळाली, असे आनंदाने जाहीर करून या साहित्यजत्रेसाठी आपला सहर्ष सहभाग नोंदवला. याबद्दल त्यांचे हार्दिक आभारासह, बहुजन साहित्य संघाच्या वतीने डॉ. कस्तुरे तसेच ज्ञानेश्वर बुधवत यांनी, अभिनंदन करून त्यांना मनापासून धन्यवाद दिले. या बैठकीस भावकवी अंकुश पडघान व इतर मान्यवर उपस्थित होते. बहुजन साहित्य संघाच्या दि. ३१ मार्च, २०२५ च्या नियोजित, मातृतीर्थ सिंदखेड राजा नगरी येथे संपन्न होऊ घातलेल्या राज्यस्तरीय सहाव्या साहित्य संमेलनाच्या निमित्ताने विचारात असलेले मातृतिर्थ बुलढाणा जिल्ह्याच्या विकासाचे प्रस्तावित मुद्दे पुढीलप्रमाणे.....

१) बहुजन साहित्य संघाचे साहीत्य संमेलन २०२५ मातृतीर्थ सिंदखेड राजा येथे संपन्न व्हावे.
२) या साहित्य संमेलनात महाराष्ट्र व महाराष्ट्रा बाहेरील मान्यवर साहित्यिक मंडळी, लेखक, कवी इत्यादींचा समावेश असावा.
३) या संमेलनासाठी परीसरातील नागरीकांसोबतच स्थानिक शासन प्रशासनाचा सुद्धा सहभाग असावा.
४) संमेलनाच्या पूर्वतयारी व संपन्नतेसाठी साहित्यिक व कार्यकत्यांची संमिती किंवा मंडळ असावे.
५) या संमेलना मध्ये वृत्तपत्रिय व वृत्तवाहीनी क्षेत्रामधील संपादक, पत्रकार, इत्यादी सर्व मान्यवरांचा सहभाग असावा.
६) या संमेलनासाठी सामिजिक, शैक्षणिक, सांकृतिक, क्रिडा तसेच राजकिय क्षेत्रातील मान्यवरांचे निस्पृह सहकार्य असावे.
७) या संमेलनाच्या निमित्ताने प्रस्तापितांच्या बरोबरच नवोदित लेखक, कवी, व साहित्यिकांना संधी मिळावी.
८) संमेलनातून मातुतीर्थ जिल्हाच्या सर्वांगीण विकासाच्या मुद्यांवर चर्चा व्हावी / परीसवांद व्हावा.
९) नागरीकांच्या मानवाधिकारांची तसेच संविधानाद्वारे मिळालेल्या मुलभूत अधिकार व कर्तव्ये यांची ओळख नागरीकांमध्ये निर्माण व्हावी.
१०) संमेलनासाठी केंद्रीय मानवाधिकार संगठन, नई दिल्ली यांचा सहभाग असावा.
११) मातृतीर्थ सिंदखेड राजा नगरी येथे राष्ट्रमाता जिजाऊ महिला विद्यापीठ असावे, यासाठी शासनाला साकडे घालावे.
१२) मातृतीर्थ जिल्ह्यातील विश्व विख्यात लोणार सरोवराच्या विकासामध्ये सरोवराच्या डोंगरकड्यांवरून पुर्व पश्चिम रोप वे साठी ( भूवैज्ञानिक विचारांतर्गत अध्ययनानुसार ) प्रस्ताव शासनासमोर मांडावा.
१३) मातृतीर्थ जिल्ह्यामध्ये विमानतळ असावे. जगप्रसिद्ध लोणार तसेच शेजारीच अजिंठा लेणी असल्यामुळे जिल्ह्यात ही सुविधा असण्यासाठी प्रस्ताव मांडावा.
१४) जिल्ह्यातील बुलढाणा शहरास टेकूनंच असलेल्या राजूर घाटातील प्रचंड डोंगरकडे विचारात घेता तेथे सुद्धा रोप वे बनवून पर्यटनाची व्यवस्था व्हावी.
१५) बुलढाणा शहराला जड वाहनांच्या वाहतूकीमुळे मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत असल्याने चिखली रोड वरील साखळी फाट्यापासून, पश्चिमे कडून शहराला वळसा घालणारा वळण मार्ग (बायपास), घाटामधुन घाट रस्ता बनवावा लागला तरी, बनवण्यात यावा.
१६) सर्व सुशिक्षित व बेरोजगार तरुणांना व महीलांना औद्योगिक क्षेत्रात सामावून घेणाऱ्या योजना शासनाने त्वरेने राबवाव्यात.
१७) मातृतीर्थ सिंदखेड राजा नगरीत मुला- मुलींचे शासकीय वसतीगृह असावे.
१८) संत चोखामेळा यांचे गाव, उपेक्षित मेहूणा राजाचा तीर्थक्षेत्र या नात्याने त्वरेने सर्वांगीण विकास होईल यावर भर देण्यात यावा.
१९) सिंदखेड राजा परिसरातील सर्व ऐतिहासिक स्थळांचे जतन व सौंदर्यीकरण करण्याला विशेष प्राधान्य देण्यात यावे.



२०) मातृतीर्थ सिंदखेड राजा नगरीमध्ये भव्य ग्रंथदालन व अध्यासन केंद्र असावे.
२१) मातृतीर्थ सिंदखेड राजा शहरामधून गेलेल्या नागपूर – पुणे महामार्गावरील जड व जलदगती वाहनांची वर्दळ लक्षात घेता शहराला वळण मार्ग असावा.....
२२) फुले आंबेडकरी विचाराचा व संविधानिक सामाजिक समरसतेचा प्रचार व प्रसार व्हावा...
इ. महत्त्वाचे विषय या संमेलनाच्या माध्यमातून विचारात घेऊन शासन प्रशासनाने त्यावर त्वरेने लक्ष केंद्रित करण्यासाठी विचार विनिमय करण्यावर भर कसा देता येईल यास्तव संमेलन मैलाचा दगड ठरेल अशी अपेक्षा बैठकीत व्यक्त करण्यात आली.

## पनवेल तालुका पोलीस ठाण्यातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी केले श्रमदान व ठेवला परिसर स्वच्छ

**दैनिक युवक आधार**

**पनवेल, वार्ताहर**:महाराष्ट्र शासनाचे शासन निर्णय आणि शंभर दिवस कृती आराखडा अनुषंगाने पोलीस आयुक्त नवी मुंबई यांचे आदेश व निर्देशाप्रमाणे पनवेल तालुका पोलीस ठाणे येथे दिनांक 6 फेब्रुवारी 2025 रोजी सकाळी 07.00 ते 09.00 वाजता वरिष्ठ पोलीस निरीक्षक गजानन घाडगे यांच्यासह सर्व अधिकारी व अंमलदार यांनी श्रमदान करून पोलीस ठाणे आणि परिसर स्वच्छता मोहिमेअंतर्गत श्रमदान करून स्वच्छ केला.त्याचप्रमाणे पनवेल तालुका पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक गजानन घाडगे यांनी माहिती दिली की वरील मोहिमे च्या अनुषंगाने पोलीस ठाणे स्वच्छता याकरिता श्री साई गणेश इंटरप्राईजेस नवीन पनवेल या संस्थेकडून पोलीस ठाणे येथे दैनंदिन व साप्ताहिक स्वच्छता सेवा पुरवण्यात येणार आहे. याबाबत वरील संस्थेकडून पोलीस ठाण्यास लेखी कळविण्यात आलेले आहे. त्याचप्रमाणे स्वच्छते मोहिमेसह नागरिकांना सौजन्याची वागणूक तसेच त्यांच्या तक्रारीचे तात्काळ निराकरण करण्याचा प्रामाणिक प्रयत्न पोलिसांकडून करण्यात येणार आहेत. महाराष्ट्र शासनाचे आय एस ओ मानांकन निरीक्षण पथकाने दिनांक 6 फेब्रुवारी 2025 रोजी पनवेल तालुका पोलीस ठाणे येथे भेट देऊन काही सूचना दिलेले आहेत. पूर्तता करीत असल्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक गजानन घाडगे यांनी याप्रसंगी सांगितले.



www.yuvakadhar.in
E mail - dainikyuvakaadhar@gmail.com
facebook : yuvakadhar

तरुणांचा बुलंद आवाज

दैनिक युवक आधार मराठी

शुक्रवार दि. ०७ फेब्रुवारी २०२५



दै. युवक आधार करीता
प्रतिनिधी नेमने आहे.
मुंबई, ठाणे नाशिक, रायगड , आलिबाग खोपोली ,पुणे , सांगली , सातारा ,कोल्हापुर, अहमदनगर, औरंगाबाद, बीड, नांदेड, शहर प्रतिनिधी नेमने आहे.
9220403509 संपर्क 9594509661
श्री.संतोष शिवदास आमले | श्री. सुरेश आत्माराम भोईर



# दादासाहेब फाळके

## चित्रपट्ट युनियन

Government of India Under trade Union act, 1926

Regd. no. A.L.C. Karyasun-17/11651

सत्यमेव जयते

Website: www.dspcunion.com

# सदस्यता अभियान

Vikas Wayal - 9892354044
Vivek Pal - 7208580551
Soniya Gole- 9322948121
Baban Mane - 9511929436
Santosh Amale - 9220403509
Gorakh Ahire- 9049131191
Dilip Dhekle- 9323227777
Milind Bagul - 9699671007
Pratibha Pawar - 9765780600
Nikhil Sawant-8308653040
Revant gajjar- 7359529343
Afzal Mehtar- 8690090002
Rajendra Rajyaguru- 9429155165
Santosh Lande - 9175941294
Kishor Gudekar - 9004248088
Rushirajsing Jadeja 9662800111



Ajit Mhamunkar
All India President

**toll free no. 81081 48889**

Shop no. 15, Sundra Niwas, opp BTTC hospital, near w. e. highway, Jogeshwari (E) Mumbai 4000 060